संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

आपली निशाणी
तुतारी वाजविणारा माणूस

JAHAGIRDAR MEDIA

सक्षम हवा आमदार नवा,
नगरकरांना आपला अभिषेकच हवा...

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) । काँग्रेस । शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आणि मित्रपक्षांच्या महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार

| अ. क्रमांक | उमेदवाराचे नाव | फोटो | निशाणी |
|---|---|---|---|
| १ | अभिषेक बाळासाहेब कळमकर<br>Abhishek Balasaheb Kalamkar | | |

तुतारी वाजविणारा माणूस या चिन्हा समोरील बटन दाबून प्रचंड बहुमतांनी विजयी करा.

प्रकाशक : निलेश मालपाणी, अ.नगर शहर विधानसभा अध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार)



रजि नं. ११४३९–५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, शनिवार दि. ०९.११.२०२४ | अंक नं. २१० | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020

हा बहुमान मिळविणारे महाराष्ट्रातील
आपण प्रथम व एकमेव!

हॅट्ट्रिक निवडीचा
अभिमान नगरचा



मा.श्री. सौरभ हेमराजजी बोरा

तिरुमला तिरुपती देवस्थानम् विश्वस्तपदी
सलग तिसऱ्यांदा निवड झाल्याबद्दल
हार्दिक अभिनंदन!

भव्य नागरी सत्कार सोहळा

रविवार, दि. १० नोव्हेंबर २०२४ रोजी सायं. ७.०० वा.
स्थळ : बडीसाजन मंगल कार्यालय, माणिक नगर, अ.नगर.

सौरभ बोरा मित्र परिवार, अहिल्यानगर

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## पहाट सरी - वाचन समाधान देणारे पुस्तक

या जगात वावरताना माणसाची जाणीव घट्ट असावी. दिखाऊपणाला किती मानायचे याचा विचार करायला पाहिजे. आपल्या आतल्या आवाजाला आपण नाहीसे करतो म्हणून आपण फुलत नाही. आपल्या आतला बहर करपतो. यासाठी आपला विचार सखोल करायला हवा.

याची सवय लागावी म्हणून लेखक डॉ. यशवंत पाठक यांनी या 'पहाटसरी' (पुस्तक) आपल्याला दिल्यात. कधी कधी शब्द आपण वापरतो तो केवळ सवयीनं. त्याला अर्थाची केवढी खोली आहे याचा पत्ता नसतो. या पुस्तकात ते आढळेल.

विचार करण्याची सवय जडेल. हे अवचित होणार नाही याची पूर्ण जाणीव




असली तरीही चांगले वाचण्याचे समाधान नक्कीच मिळेल.



या पुस्तकात ज्ञानेश्वरीवर आधारित विवेचन आहे. पहाटसरीत विविध आगळ्या वेगळ्या तथ्य असलेल्या विषयांवर सहजसुंदर सोप्या भाषेतील मांडणी आहे. आपल्या जीवनातील सोलीव सुख यात अनुभवण्यास मिळेल. संवेदनशील वाचकांना तर हे विशेष भावेल.

# केडगावमध्ये महामार्गालगतचे कपड्याचे दुकान फोडून चोरी

### घटना सीसीटिव्हीमध्ये कैद; दीड लाखांची रोकड व ४ लाखांचे कपडे चोरट्यांनी केले लंपास; गुन्हा दाखल

नगर - केडगाव च्या भुषणनगर चौकात नगर - पुणे महामार्गालगत असलेले रेडीमेड कपड्याचे दुकान चोरट्यांनी पहाटेच्या वेळी फोडून दुकानात असलेली १ लाख ५८ हजारांची रोकड, ४ लाख रुपये किमतीचे नामांकित कंपन्यांचे रेडीमेड कपडे व १ लॅपटॉप असा सुमारे ५ लाख ६८ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला आहे.



केडगावमध्ये महामार्गालगतच्या कपड्याच्या दुकानात चोरी करण्यासाठी आलेले चोरटे सीसीटीव्हीमध्ये कैद झाले आहेत.

याबाबत जगदीश दिनकर शिंदे (वय ३४, मुळ रा. पारगाव भातोडी ता. नगर हल्ली रा. ज्ञानेश्वरी अपार्टमेंटजवळ, महेशनगर, बाराबाभळी ता. नगर) यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांचे भुषणनगर चौकात महामार्गालगत असलेल्या सातपुते हाईटस येथे राणा मेन्स वेअर नावाचे कपडयाचे दुकान आहे. बुधवारी (दि.६) रात्री ९ वाजता शिंदे यांनी नेहमीप्रमाणे दुकान बंद केले व ते घरी निघून गेले. त्यानंतर गुरुवारी (दि.७) सकाळी १० च्या सुमारास त्यांनी कपडयाचे दुकान उघडले असता दुकानातील कपडे व सामान अस्ताव्यस्त पडलेले दिसुन आले. दुकानाचे पाठीमागील बाजुस असलेली खिडकी पाहिली असता खिडकीचे गज कापलेले दिसुन आले. त्यावेळी दुकानाचे काऊंटरमधील ड्रॉवर त्यांनी तपासले असता ड्रॉवरमधील १ लाख ५८ हजार रुपयांची रोख रक्कम दिसुन आली नाही. तसेच दुकानातील लॅपटॉप व काही कपडे दिसुन आले नाहीत. त्यामुळे अज्ञात चोरट्यांनी दुकानाच्या पाठीमागील बाजुचे खिडकीचे लोखंडी गज कापुन दुकानात प्रवेश करुन चोरी केली असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. सदर चोरट्यांनी

सदर घटनेबाबत त्यांनी कोतवाली पोलीसांना माहिती दिली. काही वेळाने सदर ठिकाणी पोलीस व फिंगरप्रिंटचे पथक आले त्यांनी दुकानाची पाहणी केली. दुकानातील सीसीटीव्ही फुटेज पाहिले असता त्यात पहाटे २.२४ च्या सुमारास दोन तरुण चोरटे दुकानात आलेले दिसत असून त्यातील एकाने लगेच सीसीटीव्ही कॅमेरा भिंतीकडे फिरवल्याने त्यांनी चोरी कशी केली हे दिसून आले नाही. याबाबतच्या शिंदे यांच्या फिर्यादी वरून पोलिसांनी अज्ञात चोरट्यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला असून सदर सीसीटीव्ही फुटेज तपासासाठी ताब्यात घेतले आहे.

# माणिकनगरमध्ये घरातून चोरी; १५ लाख रुपयांचा ऐवज लंपास

### सोन्या-चांदीचे दागिन्यांसह रोकडचा समावेश; पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

नगर - राजस्थान येथे देवदर्शनासाठी गेलेल्या कुटुंबाचे घर अज्ञात चोरट्यांनी फोडून सोन्या-चांदीचे दागिने, रोख रक्कम असा सुमारे १५ लाख रुपयांचा ऐवज चोरून नेल्याची घटना शहरातील माणिकनगर परिसरात असलेल्या पत्रकार कॉलनीत घडली आहे.

याबाबत निखिल मुनोत यांनी माहिती देताना सांगितले की, आपण कुटुंबियांसह २ नोव्हेंबर रोजी घराला व्यवस्थित कुलूप लावून देवदर्शनासाठी राजस्थान येथे गेलो होतो. तेथून शनिवारी (दि. ९) सकाळी ७ च्या सुमारास नगरमध्ये पोहोचलो. घरात गेल्यानंतर सर्वत्र उचकापाचक झाल्याचे दिसून आले. घराच्या पाठीमागील दरवाजाचा कडीकोयंडा तुटलेला दिसला. तसेच दरवाजा उघडा असल्याचे दिसून आले. त्यानंतर आपण घरातील कपाटात पाहणी केली असता त्यात ठेवलेले सुमारे १५ लाख रुपये किंमतीचे सोन्या-चांदीचे दागिने, ७० हजार रुपयांची रोकड असा ऐवज दिसून आला नाही. आपण देवदर्शनाला गेल्यानंतरच्या कालावधीत अज्ञात चोरट्यांनी घराच्या पाठीमागील दरवाजाचा कडीकोयंडा तोडून आत प्रवेश करत चोरी केल्याचे दिसून आले. याबाबतची माहिती त्यांनी कोतवाली पोलिसांना दिल्यानंतर पोलिसांच्या पथकाने घटनास्थळी धाव घेत पाहणी केली. ठसेतज्ज्ञांच्या पथकानेही चोरट्यांचे ठसे कुठे आढळतात का याची पाहणी केली.

दुपारी उशिरा निखिल मुनोत हे कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद देण्यासाठी गेले होते. गुन्हा दाखल करण्याचे काम उशिरापर्यंत सुरु होते.

# कामासाठी शेतात गेलेल्या शेतकऱ्याचे घर भरदिवसा फोडून रोकड व दागिन्यांची चोरी

नगर - घराला कुलूप लावून कामासाठी कुटुंबासह शेतात गेलेल्या शेतकऱ्याचे घर अज्ञात चोरट्यांनी भरदिवसा फोडून रोकड व दागिन्यांची चोरी केल्याची घटना नगर तालुक्यातील पिंपळगाव उज्जैनी शिवारात पोखर्डी रोडवर मगर वस्ती येथे घडली आहे.

याबाबत पांडुरंग कुशीनाथ चेमटे (वय ४८, रा. मगर वस्ती, पोखर्डी रोड, पिंपळगाव उज्जैनी) यांनी एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुरुवारी (दि.७) मध्यरात्री फिर्याद दिली आहे. फिर्यादी चेमटे व त्यांचे कुटुंबीय बुधवारी (दि.६) सकाळी १० च्या सुमारास घराच्या दरवाजाला आणि बाहेरील गेटला कुलूप लावून मिरावली पहाडाकडे असलेल्या त्यांच्या शेतात गव्हाला फवारा मारण्यासाठी गेले होते. दुपारी त्यांना शेंडी येथे दुकानात तार विकत घ्यायला जायचे असल्याने ते घरी आले असता त्यांच्या घराच्या गेटचे व दरवाजाचे कुलूप तुटलेले दिसले. त्यांनी घरात जावून पाहिले असता घरातील साहित्य अस्ताव्यस्त पडलेले दिसले. अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या घरात घुसून कपाटातील ६४ हजारांची रोकड, २५ हजार रुपये किंमतीची सोन्याची अंगठी असा ८९ हजारांचा ऐवज चोरून नेला असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. या बाबत त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी अज्ञात चोरट्यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक मोंढे करत आहेत.

## ॲड. सीताराम गाडळकर यांचे वृद्धापकाळाने निधन

नगर - येथील सारसनगर भागातील गाडळकर मळ्यातील



ॲड. सीताराम गाडळकर (वय ७५) यांचे वृद्धापकाळाने ९ नोव्हेंबर रोजी निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्यामागे पत्नी, २ मुली, १ मुलगा असा परिवार आहे. पाटबंधारे खात्यातील घोडेगाव येथील अधिकारी वैजयंता गाडळकर व पुणे मनपातील नगर रचनाकार सुदर्शन गाडळकर यांचे ते वडील होत.

## भिंगारमध्ये अपघातात जखमी झालेल्या व्यक्तीचा उपचारादरम्यान मृत्यू

नगर - रस्ता ओलांडत असताना अज्ञात वाहनाने दिलेल्या धडकेत गंभीर जखमी झालेल्या अनिल बाजीराव आळकुटे (वय ५१, रा. वडारवाडी, भिंगार) यांचा जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचार सुरु असताना शुक्रवारी (दि.८) मृत्यू झाला आहे.

सदरचा अपघात भिंगार येथील म्हस्के हॉस्पिटलसमोर २ नोव्हेंबर रोजी दुपारी झाला होता. आळकुटे हे रस्ता ओलांडत असताना त्यांना अज्ञात वाहनाने धडक दिल्याने ते जखमी झाले होते. त्यांना त्यांचा पुतण्या विलास मुकुंदा आळकुटे याने दुपारी २.३५ च्या सुमारास उपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केले होते. तेव्हापासून त्यांच्यावर उपचार सुरु होते. उपचारादरम्यान शुक्रवारी (दि.८) सकाळी ९.४० च्या सुमारास त्यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी भिंगार कॅम्प पोलिस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

## रामभाऊ शिंदे यांचे अल्पशा आजाराने निधन

भिंगार - कुंभार गल्ली येथील रामभाऊ बाबाजी शिंदे (वय



६५) यांचे ९ नोव्हेंबर रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर भिंगार येथील अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.

ते भिंगार येथील कॅन्टोन्मेंटमध्ये मुकादम म्हणून सेवानिवृत्त झाले होते. त्यांच्या पश्चात पत्नी, १ मुलगा, २ मुली, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. ते गौरव शिंदे यांचे वडील होत.

## राणू मुटकुळे यांचे अल्प आजाराने निधन

नगर - चिचोंडी पाटील येथील रहिवासी राणू किसन मुटकुळे



(वय ८५) यांचे ९ नोव्हेंबर रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर गावातील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या पश्चात पत्नी, ३ मुले, २ मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. साहेब, आनंदा, भाऊसाहेब यांचे ते वडील होत.

### समाजसेवक आणि मार्गदर्शक

## प्रा. देवेंद्र कवडे यांचे निधन

नगर - नालेगाव, अहमदनगर समाजसेवक आणि प्रभावी



वक्ते प्रा. देवेंद्र रभाजीराव कवडे (७७) यांचे ६ नोव्हेंबर रोजी निधन झाले. नगर व महाराष्ट्रातील अनेक लोकांशी त्यांचे वैयक्तिक व जिव्हाळ्याचे संबंध होते, त्यांना माणसे जोडण्याचा तसेच गरजूंना आर्थिक व वैद्यकीय मदत करण्याचा छंद होता.

प्रा. कवडे यांचे व्यक्तिमत्त्व केवळ समाजसेवक म्हणूनच नव्हे, तर एक प्रभावी वक्ता म्हणून देखील ओळखले जात होते. समाजातील गरजूंना मदतीचा हात देण्याची त्यांची प्रवृत्ती, संकटात धावून जाण्याची त्यांची सवय आणि विविध संस्थांमधील सक्रिय योगदानामुळे ते आदर्श ठरले.

प्रा. कवडे हे हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ, अमरावती येथे अध्यापक म्हणून काम केले तसेच ते स्वातंत्र्यसैनिक उत्तराधिकारी संघटनेचे उपाध्यक्ष होते. त्यांचा क्रीडाशिक्षक कार्यकाल देखील प्रभावी होता, जिथे त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धांमध्ये पदकं मिळवली. त्यांनी अनेक आंतरराष्ट्रीय कुस्ती स्पर्धांचे आयोजन केले.

१९९३ साली त्यांनी अहमदनगर नगरपालिकेत सत्ता स्थापनेसाठी महत्त्वपूर्ण भूमिका निभावली, त्या साली त्यांच्या पत्नी कै. राजश्री कवडे यांनी नगरपालिकेत विविध कमिटीचे चेअरमनपद भूषविले.

त्यांच्या पश्चात मुलगा गजेंद्र कवडे, बंधू डॉ. रविंद्र व सुरेंद्र कवडे, भगिनी सुलभा वाळके, पुतणे न्यायाधीश योगेंद्र व महेंद्र कवडे, पुतणी प्रियंका, भाचा अभिनंदन वाळके, भाची श्वेता व स्वप्ना वाळके आहेत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# महिला डॉक्टरला 'डिजिटल अरेस्ट' करून सव्वादहा लाख रुपयांची केली फसवणूक

### नगर जिल्ह्यातील पहिलीच घटना, सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

नगर - शहरात राहणार्या एका महिला डॉक्टरला डिजिटल अरेस्ट (अटक) करून तिची तब्बल १० लाख २६ हजार रुपयांची फसवणूक केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. फसवणूक झालेल्या पीडित महिला डॉक्टरने या प्रकरणी येथील सायबर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दोन मोबाईल नंबर धारक अज्ञात व्यक्तीविरुध्द गुरूवारी (दि. ७) सायंकाळी गुन्हा दाखल केला आहे. डिजिटल अरेस्टची जिल्ह्यातील ही पहिलीच घटना आहे.

सदरची घटना २८ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी साडेदहा ते सायंकाळी सहा या वेळेत घडली आहे. २८ ऑगस्ट रोजी सकाळी साडेदहाच्या सुमारास फिर्यादी महिला त्यांच्या घरी असताना त्यांना एका अनोळखी मोबाईल नंबरवरून फोन आला. तो फोन करणारा व्यक्ती म्हणाला, 'मी दिल्ली क्राईम ब्रँच मधून बोलतोय. तुमचा मोबाईल नंबर चाईल्ड पोर्नोग्राफीमध्ये वापरण्यात आला आहे. त्यामुळे तुमच्याविरूध्द नोटीस काढण्यात आली आहे. तुम्हाला जर हे प्रकरण मिटवायचे असेल तर आम्हाला सांगा'. त्यावर फिर्यादीने प्रकरण मिटविण्यासाठी संमती दिल्याने त्या व्यक्तीने तुमचा कॉल 'सीबीआय' ला ट्रान्सफर करतो असे सांगितले.

फिर्यादीला ११ वाजता एका अनोळखी मोबाईल नंबरवरून व्हॉट्सॲपवर व्हिडीओ कॉल आला. व्हिडीओ कॉलवर बोलणारी व्यक्ती पोलीस गणवेशात पोलीस ठाण्यात बसलेली दिसत होती. ती व्यक्ती फिर्यादीला म्हणाली, 'तुमच्या मोबाईल नंबरचा वापर करून चाईल्ड पोर्नोग्राफीसाठी झाला आहे. तसेच तुमचे आधार कार्ड व मोबाईल नंबरचा वापर करून संदीप कुमार या नावाने बँकेत अकाउंट ओपन केलेले आहे. त्यावर खूप मोठ्या प्रमाणात ब्लॅक मनी असून सदर व्यक्ती हा फरार आहे. त्यामुळे सदर घटनेस आपण जबाबदार आहे. तुम्हाला जर हे प्रकरण मिटवायचे असेल तर तुम्ही तुमच्या बँकेचे सेव्हिंग आम्हाला द्या, त्याची आम्ही पडताळणी करू की सदर रक्कम ही मनीलॉन्ड्रींगची आहे की नाही.

तुम्ही सदर बाबत कोणाशी संपर्क केला तर तुमचे लायसन्स रद्द होवून तुमच्या विरूध्द नॉन बेलेबल गुन्हा दाखल होईल तसेच तुमचे पती आणि वडिल यांना कळविले तर त्यांच्याविरूध्द गुन्हा दाखल होवून त्यांचे बँक अकाऊंट देखील फ्रिज होतील' अशी धमकी दिली. समोरच्या व्यक्तीने त्यांना व्हिडीओ कॉल चालू ठेवण्यास सांगितले. त्याने सांगितलेल्या बँक खात्यावर फिर्यादीने सुरूवातीला पाच लाख २६ हजार व नंतर पाच लाख रुपये पाठविले. तुम्ही डिजिटल अटक असून तुम्ही कोणाशीही संपर्क करू शकत नाही असे सांगून सायंकाळी सहा वाजेपर्यंत व्हिडीओ कॉल सुरू ठेवला व नंतर कॉल कट करून टाकला.

सदरची माहिती फिर्यादीने त्यांच्या पतीला दिली. आपली फसवणूक झाली असल्याचे त्यांच्या लक्ष्यात आल्यानंतर त्यांनी येथील सायबर पोलिसांकडे तक्रार अर्ज दाखल केला होता. पोलिसांनी त्या अर्जाची चौकशी करून ७ नोव्हेंबर रोजी गुन्हा दाखल केला आहे. पोलीस निरीक्षक मोरेश्वर पेंदाम अधिक तपास करत आहेत. डिजिटल अरेस्टचा हा जिल्ह्यातील पहिलाच प्रकार असल्याचे पोलिसांनी सांगितले. राज्यात अशा अनेक घटना घडल्या आहेत. मात्र जिल्ह्यात ही पहिलीच घटना घडल्याची फिर्याद सायबर पोलिसांकडे दाखल झाली आहे. नागरिकांनी अशा प्रकारच्या फोनला प्रतिसाद न देता पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन सायबर पोलिसांनी केले आहे.

# पर्यटनासाठी गेलेल्या व्यावसायिकाचे केडगाव येथील घर फोडून धाडसी चोरी

### ९ तोळ्याचे दागिने, ५५० ग्रॅमचे चांदीचे दागिने, दीड लाखांची रोकड पळवली

नगर - गोवा येथे फिरायला गेलेल्या व्यावसायिक कुटुंबाचे घर चोरट्यांनी फोडून सुमारे ९ तोळ्याचे सोन्याचे दागिने, ५५० ग्रॅमचे चांदीचे दागिने, १ लाख ५० हजारांची रोकड, मोबाईल असा ४ लाख ४४ हजारांचा ऐवज चोरून नेला आहे. सदरची घटना केडगाव उपनगरातील भगवाननगर मध्ये घडली आहे.

या प्रकरणी गुरूवारी (दि.७) सायंकाळी कोतवाली पोलीस ठाण्यात दोन अज्ञात चोरट्यांविरूध्द घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. व्यावसायिक योगेश प्रकाश संचेती (वय ४४) यांनी फिर्याद दिली आहे. ते नगर- पुणे महामार्गावरील केडगाव शिवारात भगवाननगरमध्ये राहतात. दिवाळी सुट्टी असल्याने संचेती यांचे कुटुंब व नातेवाईक शनिवारी (दि.२) गोवा येथे फिरण्यासाठी गेले होते. जाताना त्यांनी त्यांचे घर कुलूप लावून बंद केले होते. चोरट्यांनी कुलूप तोडून घरात प्रवेश केला.

बेडरूममधील कपाटाची उचकापाचक केली. त्यातील १ लाख ५० हजार रूपयांची रोकड, २५ ग्रॅमच्या सोन्याच्या बांगड्या, २० ग्रॅमचे कानातील सोन्याचे सहा जोड, २५ ग्रॅमची गळ्यातील सोन्याची चेन, १५ ग्रॅमच्या चार सोन्याच्या अंगठ्या, २.५ ग्रॅमचे सोन्याचे ब्रेसलेट, ३०० ग्रॅमचे चांदीचे ताट, १५० ग्रॅमचे चांदीचे सहा जोड, १०० ग्रॅम चांदीचे १० कॉईन व एक मोबाईल असा एकुण ४ लाख ४४हजार रूपयांचा ऐवज चोरून नेला.

दरम्यान, फिर्यादी हे गुरूवारी गोवा येथून आल्यानंतर त्यांना घरफोडी झाल्याचे लक्षात आले. त्यानंतर त्यांनी कोतवाली पोलिसांना घरफोडीची माहिती दिली.

पोलिसांनी घटनास्थळी भेट दिली असून अधिक तपास सहायक पोलीस निरीक्षक विकास काळे करत आहेत.

# घराबाहेर खेळणाऱ्या ५ वर्षीय बालकाचे अपहरण

नगर - घराबाहेर खेळत असलेल्या ५ वर्षीय बालकाचे अज्ञात इसमाने अपहरण केल्याची घटना नगर तालुक्यातील हिंगणगाव येथे गुरुवारी (दि.७) दुपारी घडली आहे. याप्रकरणी एम आयडीसी पोलिसांनी अज्ञात इसमाविरुद्ध अपहरणाचा गुन्हा दाखल केला असून त्याचा शोध सुरु केला आहे. ऋषी बाळासाहेब आंबेकर असे अपहरण झालेल्या बालकाचे नाव आहे.

याबाबत विश्वनाथ नंदराम सोनवणे (रा. हिंगणगाव) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांची मुलगी व नातू ऋषी हे दिवाळी निमित्त दि.३ नोव्हेंबर रोजी हिंगणगाव येथे फिर्यादीच्या घरी आलेले होते. गुरुवारी (दि.७) ऋषी हा घराबाहेर खेळत होता. तो तेथून अचानक बेपत्ता झाला. त्याचा गावच्या परिसरात सर्वत्र शोध घेतला परंतु तो मिळून आला नाही. त्यामुळे त्याचे कुणीतरी अज्ञात इसमाने अपहरण केल्याचा संशय व्यक्त करत सोनवणे यांनी शुक्रवारी (दि.८) पहाटे एमआयडीसी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली.

पोलिसांनी अज्ञात इसमाविरुद्ध अपहरणाचा गुन्हा दाखल केला असून अपहृत बालकाचा शोध सुरु केला आहे.

# वडगाव गुप्ता परिसरातून अल्पवयीन मुलीचे अपहरण

नगर - नगर तालुक्यातील वडगाव गुप्ता परिसरातून एका १६ वर्षीय अल्पवयीन मुलीचे अज्ञात व्यक्तीने अपहरण केल्याची घटना गुरुवारी (दि.७) रात्री घडली आहे. याबाबत सदर मुलीच्या आईने शुक्रवारी (दि.८) एमआयडीसी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. सदरची अल्पवयीन मुलगी गुरुवारी रात्री घरी असताना अज्ञात व्यक्तीने तिला फूस लावून पळवून नेले. मुलगी बेपत्ता झाल्याचे निदर्शनास आल्यानंतर तिच्या कुटूंबियांनी तिचा सर्वत्र शोध घेतला. मात्र ती मिळून आली नाही. त्यामुळे तिचे अज्ञात व्यक्तीने अपहरण केले असल्याचा संशय व्यक्त करत तिच्या आईने एमआयडीसी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. या फिर्यादीवरुन पोलिसांनी अज्ञात इसमाविरुद्ध अपहरणाचा गुन्हा दाखल केला आहे.

# गृहिणी

## आरोग्य

### ताकाचे हेही फायदे

* रिकाम्या पोटी ताक प्यायल्याने पोटदुखी बरी होते.

* ताकात साखर आणि काळी मिरी टाकून प्यायल्यास पित्ताचा त्रास कमी होतो.

* लहान मुलांना दात येतेवेळी त्यांना दररोज ४ चमचे असे दिवसभरातून २-३ वेळा दिल्यास दात येताना मुलांना होणारा त्रास कमी होतो. * महत्वाचे म्हणजे तीन दिवस इतर काहीही न खाता ताक पीत राहिल्यास आपल्या शरीराचे पंचकर्म आपोआप होते.

## पाककला

### कांद्याचे लोणचे

**साहित्य** - ६ मोठ्या आकाराचे ताजे कांदे, दीड चमचा हळद, ३ चमचे आमचूर, दीड चमचा मेथ्या, ३ चमचे बडीशेप, अर्धा चमचा मोहरीची पावडर, दीड चमचा कलौंजी, अर्धा चमचा गरम मसाला, चवीनुसार मीठ, मिरची पूड, तळण्यासाठी शेंगदाणा तेल.

**कृति** - सर्वप्रथम कांदे सोलून प्रत्येकाचे ८ तुकडे करा. कढईत तेल तापवून ते तुकडे साधारण भुरकट होईपर्यंत तळून घ्या. तळलेले कांदे एका भांड्यात काढून घ्या. बडीशेप, मेथ्या भाजून भरड वाटून घ्या. आता मीठासह सर्व मसाले तळा व कांद्यात टाकून व्यवस्थित मिसळा.

कलौंजी व गरम मसालाही टाका. व्यवस्थित मिसळून थंड झाल्यानंतर बरणीत भरा. स्वच्छ कापडाने बांधून उन्हात ठेवा. दुसऱ्या दिवशी दीड वाटी तेल गरम करून थंड करा व त्यावर ओता.

## सौंदर्य

### मुलायम केसांसाठी

आवळा, रिठा व शिकेकाईची पेस्ट बनवून केसांना लावा व नंतर धुवा. ॲलोव्हेरा जेल केसांना १५ मिनिटे लावून ठेवा व नंतर धुवा. केसांतील कोंडा नष्ट होऊन केस मुलायम होतात. त्याचप्रमाणे केसांना कोरफडीचा गर लावल्याने केस सतेज होतात.

## वास्तू

* कापलेली भाजी कधीही थेट जमिनीवर ठेवू नये. * मळलेल्या कपड्यांत धुतलेले कपडे मिसळू नयेत.

## सल्ला

लाल तिखटामध्ये थोडेसे काळे मीठ टाकले तर तिखट खराब होत नाही.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

रविवार, दि. १० नोव्हेंबर २०२४

**कूष्मांड नवमी, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, कार्तिक शुक्लपक्ष, धनिष्ठा ११।००, सूर्योदय ०६ वा. ३१ मि. सूर्यास्त ०६ वा. ३३ मि.**

### राशिभविष्य

**मेष** : आपल्या कार्यक्षेत्रातील किंवा आपल्या व्यापारातील इतर लोकांशी व्यवहार करताना सावधगिरी बाळगा.

**वृषभ** : अधिक श्रम करावे लागतील. पळापळ देखील अधिक राहील. वातावरण अनुकूल राहील.

**मिथुन** : एखाद्या मित्राशी झालेली भेट दिलासा देईल. आर्थिक पक्षाबाबत सावध राहा. व्यवसायातील अनेक कामे मार्गी लागतील.

**कर्क** : कौटुंबिक पाठिंबा देखील मिळणार नाही. जिद्दीने व चिकाटीने कार्यरत रहाल.

**सिंह** : आपणास वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून समर्थन मिळेल. मानसन्मानात वाढ होईल. महत्त्वाची कामे पूर्ण करू शकाल.

**कन्या** : आज आपणास कठोर श्रम करावे लागेल. धार्मिक कार्यांमध्ये खर्च होण्याची शक्यता आहे. वैवाहिक सौख्य लाभेल.

**तूळ** : आजचा दिवस कालच्या दिवसापेक्षा चांगला नसेल. मानसिक स्थिती आल्हाददायक राहील.

**वृश्चिक** : आरोग्याची काळजी घ्या. व्यस्त राहाल. कौटुंबिक विषयांमध्ये पैसा खर्च होईल. आरोग्य उत्तम राहील.

**धनु** : मानसन्मानाचे योग येतील. व्यापार-व्यवसायात अडचणी येण्याची शक्यता.

**मकर** : चांगले भोजन मिळेल. मौजमजेत दिवस व्यतीत होईल.

**कुंभ** : संभाषणात सावधगिरी बाळगावी लागेल. देवाण-घेवाण काळजीपूर्वक करा. मानसिक अस्वस्थता जाणवेल.

**मीन** : खर्च अधिक होईल. मनोबल व आत्मविश्वास वाढवणारी एखादी घटना घडेल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## हसा आणि शतायुषी व्हा!

**गण्या :** आजी, मी पळण्याच्या शर्यतीमध्ये भाग घेतला.
सगळी तयारी पूर्ण झाली फक्त तुझ्या आशीर्वादाची गरज आहे.
असे म्हणून गण्या आजीच्या पाया पडतो.
**आजी :** सावकाश पळ रे बाबा!

## ...वाढवूया आपले सामान्य ज्ञान

* जागतिक वारसा दिन कधी असतो? - १८ एप्रिल
* पहिल्या बौद्ध परिषदेचे अध्यक्ष कोण? - महाकश्यप
* ताजमहल कोणत्या नदीच्या काठावर आहे? - यमुना
* दर दोन मीटरवर खांब याप्रमाणे एकूण ६० मीटरवर अंतरात किती खांब रोवता येतील? - ३१ खांब

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## शब्दगंध क्र. ७०४६ सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ■ | ३ | ४ | | ५ |
| ६ | | ■ | ७ | | | ■ | |
| | ■ | ८ | | | ■ | ९ | |
| १० | ११ | | ■ | १२ | | | |
| ■ | १३ | | १४ | | ■ | | ■ |
| १५ | | ■ | | ■ | १६ | | १७ |
| १८ | | ■ | १९ | | | ■ | |
| २० | | ■ | | ■ | २१ | | |

**आडवे शब्द :-** १) इच्छा; आकांक्षा; कामना ३) गोंधळाची अवस्था; बजबजपुरी ६) कागदी चलन ७) वाळविलेले द्राक्ष ८) होडी हकणारा; नाव चालविणारा ९) श्वासोच्छ्वास करण्याचे इंद्रिय १०) लक्ष्मीपती; विष्णू १२) पसरलेला सुगंध १३) न्यायाने किंवा अन्यायाने; अकारण किंवा सकारण १५) माणसे; लोक १६) खूण; चिन्ह १८) आई; जननी; माय १९) बाभळीच्या शेंगेतील बी २०) पुरुषाचे एक टोपणनाव; अनेकविध २१) मोठे गाव; नगर

**उभे शब्द :-** १) चित्ताकर्षक; व्यंकटेशाचा प्रसाद २) सरळ; स्वच्छ; साफ ३) अनुवाद करणारा ४) पौर्णिमा (चंद्र) ५) आस्था; आपुलकी ७) यज्ञ; यजन; याग ८) नाश करणारा ९) हिचे मीठ अळणी असते असे म्हणतात ११) श्रमाचा मोबदला १४) मंत्र्याच्या नावाअगोदर लावतात तो सन्मानदर्शक शब्द १५) युग; हंगाम १६) उजेड १७) अनर्थ; बिकट प्रसंग; पराकाष्ठा

### शब्दगंध क्र. ७०४५ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| सा | व | धा | न | ■ | पा | सं | ग |
| म | ळ | व | ट | ■ | र | ■ | ड |
| ता | व | ■ | व | सुं | ध | रा | ■ |
| ■ | ट | स | र | ■ | ■ | ■ | घो |
| अ | ■ | ह | ■ | रा | म | दा | स |
| द | ■ | न | मा | ज | ■ | र | ■ |
| मा | व | शी | ■ | व | न | वा | स |
| स | ■ | ल | ग | ट | ■ | न | वा |

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक :
ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : प्रेम पापी लोकांनाही सुधारू शकते.

## मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

### घरातील दारे व खिडक्या समोरासमोर असाव्यात, असे का म्हणतात?

दारे-खिडक्या बंद असलेल्या घरात गेले, तर कोंदटल्यासारखे होते. गावाला जाताना आपण घराची दारे-खिडक्या लावून घेतो. गावाहून आल्यानंतर घरात शिरल्याबरोबर घुसमटल्यासारखे होते. त्यामुळे पहिले काम आपण करतो ते म्हणजे दारे खिडक्या सताड उघडतो व पंखे चालू करतो. १०-१५ मिनिटांत आपल्याला बरे वाटायला लागते. थिएटरमधून बाहेर पडल्यानंतरही याचमुळे बरे वाटते. घरातील हवा कार्बनडायऑक्साईडचे वाढणारे प्रमाण, धूळ-धूर, जिवाणू, विषाणू यांच्यामुळे दूषित होत असते. आपल्या वावरामुळे हवेतील बाष्प व उष्मा यांच्यातही वाढ होत असते. त्यामुळे ही दूषित हवा बाहेर जाऊन शुद्ध हवा घरात येणे आवश्यक असते. म्हणून घराला दारे-खिडक्या असल्याने बाहेरील हवा आत येते. दारे-खिडक्या समोरासमोर असल्याने वायूवीजन सुरळीत होते. हवा एकीकडून येऊन दुसरीकडून निघून जाते व शुद्ध हवेचा प्रवाह कायमसाठी चालू राहतो.

गरम झालेली हवा वर जात असल्याने ती बाहेर पडावी, यासाठी घरात भिंतीच्या वरच्या भागात व्हेन्टीलेटर्स असतात. समोरासमोर असलेल्या दारे व खिडक्या यामुळे वायूवीजन चांगले होते. तसे न झाल्यास दूषित हवेच्या अनेक दुष्परिणामांना आपल्याला तोंड द्यावे लागते.

### बेडकीला झाला गर्व

तळ्यातल्या बेडकांची काही पिलं खेळायला म्हणून काठाजवळच्या कुरणात आली. तेथे ती लपाछपीचा खेळ खेळू लागली. तेथील कुरणात एक मोठा बैल चरत होता. खेळता-खेळता बेडकाचे एक पोर बैलाच्या पायाखाली सापडून मरण पावले. ते पाहताच बेडकाची सर्व मुले घाबरुन घरी आली.

त्यातील एका मुलाने आईला ती हकीगत सांगितली आणि म्हणाला,

''आई, आतापर्यंत आम्ही असा मोठा प्राणी कधी पाहिला नव्हता. कसा धिप्पाड शरीराचा होता, बघ तो. त्यावर त्याची आई बेडकी म्हणाली,''

मुला, खूप मोठा होताना तो? मुलगा 'हो' म्हणताच बेडकीने आपले पोट फुगवीत म्हटले,''

इतका मोठा होता का रे?''

त्यावर बेडकीने आणखी पोट फुगवून दाखविले. तेव्हा ती मुले म्हणाली,''

आई, तू कितीही पोट फुगवून दाखविलेस, तरी त्या प्राण्याच्या नखाचीसुद्धा बरोबरी तू करु शकणार नाहीस.''

तेव्हा बेडकी गर्वाने आणखी फुलू लागली असता एका क्षणी तिचे पोट फुटले आणि ती प्राणाला मुकली.

**तात्पर्य** : ज्याची बरोबरी आपण कधीही करु शकत नाही, तसा प्रयत्न केल्यावर संकट ओढवून घेण्यासारखे आहे.

## जीवन चक्र - मृत्यू रहस्य (जीवन की रोशनी)



### जीवन की रोशनी

मिलती है जिसके लिए ये लोग धरती पर रहते हुए कामना कर रहे होते हैं। बह्ला (मर चुके प्रसिद्ध व्यक्तियों और युद्ध में शहीद योद्धाओं हुए का अन्तिम आराम स्थान) मुसलमानों के खुशियों से भरे बहिरात या स्वर्ग, सुनहरे द्वार वाला नया योरोसलम या Lyceum Filled स्वर्ग है।

कलाकारों अर्थात और अधिक उन्नति कर चुके मनुष्यों की आत्माएँ छठे उपलोक में स्थान प्राप्त करती हैं। सातवाँ और सबसे ऊँचा उपलोक राजनैतिक नेताओं, प्रबन्धकों और साईंसदानों के लिए होता है। ये वे लोग होते हैं जो अपने भौतिक जीवन में संसारिक ज्ञान इकट्ठा करते रहे और संसारी बने रहे। काम लोक में जीवन अधिक क्रियाशील, शकलें अति शीघ्र बदल जाने वाली और आत्मिक मादा अधिक सूक्ष्म, अधिक आवेश युक्त (Charged) पारदर्शी और अर्द्धपारदर्शी होते हुए भी अधिक गहरा और न दिखाई देने वाला होता है। यहाँ विचार, शकलें रंग बदलती प्रकट होती हैं और गुप्त हो जाती हैं, क्योंकि इन्द्रीय ज्ञान भावनाओं और जज़्बों द्वारा पैदा हुई लहरें बहुत गतिशील होती हैं।

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

### अंतरीक बल

हम कोई जगराता आज से तीसरे दिन करना चाहते है तो सभी कार्य तीव्र गति से तीन दिन में पूरे करेगें। अगर हम सोचते है कि तीन महीने बाद जगराता करेगें तो उस से संबन्धित कार्य धीरे धीरे करेगें जो तीन दिन में किए थे, वही कार्य तीन महीने में करेगें। इसलिए समय प्रबन्धन में पार्किन्सन के नियम का लाभ लें। हम सभी कंप्यूटर पर कार्य करते हैं। हम भिन्न भिन्न फाइल्स खोल लेते हैं। हम जो भी कार्य करते हैं कंप्यूटर उस पर कार्य करता है। हम कंप्यूटर पर नये कार्य करते रहते हैं। परंतु हमारी दी हुई कमांड के अनुसार पीछे सर्च भी करता रहता है। हमारा दिमाग भी ऐसे ही कार्य करता है। हम सोचते हैं आज शाम को ४ बजे बाजार जा चाहिए। जो भी आप करना चाहते हैं उसके बारे सोचा करो, ताकि दिमाग उस को हकीकत में लाने के लिये कार्य करने लग जाए। इस लिये सोचा करो आज के काम आज ही खत्म करूंगा। बिजली, टेलिफोन और दूसरे बिल आते ही भर देगें। हम सुबह चार बजे उठेगें। आप जो भी प्राप्त करना चाहते हैं उसे लिख लें और उस काम को ५ मिनट जरूर करना है। आप इंग्लिश सीखना चाहते हैं तो ५ मिनट इंग्लिश की कोई बुक हर रोज पढ़नी है। आप शांति चाहते हैं तो ५ मिनिट हर रोज सतसंग जरूर जाएंगे। आप स्वास्थ्य चाहते है तो पांच मिनिट पार्क जाएंगे, ५ मिनिट स्वास्थ्य पर पढ़ेंगे। आप लेखक बनना चाहते है तो ५ मिनिट कुछ न कुछ जरूर लिखा करो। कोई बुक लो। उसका कोई टापिक पढ़ो और उसे जबानी लिखो। इस के इलावा आप जो कुछ चाहते हैं उस पर ५ मिनिट बैठ कर सोचा करो और उसे लिख लो। आप जो सोच रहें हैं, सोचते ही आप का दिमाग कार्य शुरू कर देता है और आप को समय पर मनचाहे लक्ष्य प्राप्त हो जाएंगे। आप का समय बच जाएगा। समय प्रबन्धन और पार्किंसन का नियम (३) दिमाग की विशेषता यह है कि इसे कोई काम दिया जाता है तो

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## साहित्य सहवास - 'रोते रोते हसना सिखो...'

अमिताभ ह्यांना मिळालेल्या भूमिकेचं त्यांनी सोनं केले. महानायक एका रात्रीत कुणीच होऊच शकणार नाही. 'मैं आज भी फेके हुए पैसे नही ऊठाता,' 'हम जहां खडे होते है लाईन वहांसे शुरु होती है,' 'जाव पहले ऊस आदमी का साईन लाव...' ह्यांसारख्या असंख्य संवादांचे ह्या अँग्री यंग मॅनने सोनं केलं, सुपरस्टारपदी पोहचलेला सहस्त्रकातल्या महानायकाच्या वाट्याला आलेली काही गाणी जगण्याचं सुत्र सांगणारी आहेत. 'अंधा कानुन' चित्रपटातील 'रोते रोते हंसना सिखो...' हे अमिताभ, माधवी आणि त्यांच्या मुलींवर चित्रित झालेलं हे गाणं प्रत्येकाने जीवन कसं जगावं ह्याचा मंत्र देते. ह्या गाण्यातील अमिताभच्या पायांवर, मुलीचे पाय आहेत. अमिताभ चालताहेत हे दृष्य बरंच काही सांगणारं आहे. अत्यंत चांगलं दिग्दर्शन असलेलं हे गाणं आजही लोकप्रिय आहे कारण त्या गाण्याचे बोल, गाण्याचा महान अर्थ.

प्रत्येक आई, वडिलांना आपलं अपत्य, प्राणाहुनही प्रिय असतं. आपल्या अपत्यावर चांगले संस्कार करंत त्याने एक चांगला 'माणूस' व्हावं, एक चांगला मित्र, नागरिक व्हावं ह्यासाठी जे जे करता येईल ते ते करण्याचा त्यांचा, प्रयत्न अव्याहतपणे चालुच असतो. अपत्याचं संगोपन ही मानवी जीवनातली हवीहवीशी छानशी जबाबदारी, कर्तव्य आहे. 'हम दो एक हमारी प्यारी प्यारी मुनिया है, बस यही छोटीसी अपनी सारी दुनिया है...' गाण्यातल्या ह्या ओळी आई, वडिल व अपत्य ह्यांच्यातल्या ममत्वाचं, आपलेपणाचं छानसं वर्णन करतात. अपत्य हेच आपलं सर्वस्व आहे. अपत्य जसजसं मोठं होऊ लागतं, रांगतं, चालण्याचा प्रयत्न करतं, चालु लागलं, पावलांचा आकार वाढत जातो तसं ममत्वही अधिकाधिक गहिरं होत जातं. पालक म्हणून जगण्याचा मोह, आटापिटा हा आपल्या अपत्यासाठीच असतो, असायलाच पाहिजे. निरागस, निष्पाप लहानग्यांकडे पाहिलं की जीवन किती सुंदर आहे हे लक्षात येतं. मग ह्याच सुंदर जीवनाचा भरभरुन आस्वाद घ्यावासा वाटतो. 'जितनी चाबी भरी है रामने, उतना चले खिलौना...' गाण्यातील ही ओळ एकदाच मिळणारं जीवन अमूल्य आहे हे सांगतांनाच आपल्या वाट्याला आलेली भूमिका अत्युत्कृष्ठ करण्याचा प्रयत्न करा हे सांगणारी, शिकवणारी आहे.

एखादी आनंददायक घटना आपल्या बाबतीत घडते. आपल्याला आनंद होतो, आपण प्रसन्न दिसतो परंतु त्याचवेळी, पुढच्या काही मिनिटांत आपल्या बाबतीत अथवा आपल्या जवळच्या व्यक्तीच्या बाबतीत वाईट घटना घडली की आपण रडतो. भूमिकेतला हा बदल अगदी नैसर्गिक होतो, व्हायलाच पाहिजे कारण आसु आणि हसु हे मानवी जीवनातलं सत्य आहे. सत्य हे प्रत्येक क्षणी, कोणत्याही परिस्थितीत, मनस्थितीत असते. तरी स्वीकारावंच लागतं. रडत असतांना खरं तर हसणं एवढं सोप्पं नसतं. पण हे लीलया साध्य करण्याची किमया म्हणजेच जीवन. सुख आणि दुःख हा मनुष्य जीवनात अविभाज्य भाग आहे हे सांगण्याचा ह्या गाण्यातुन केलेला प्रयत्न आपल्याला खूप काही सांगतो. आपलं घर, कुटुंब तेव्हाच आदर्श, योग्य असेल जेव्हा प्रत्येकाला 'रोते रोते हसना आ जायेगा...' हे फक्त एक गाणं नाही तर आलेल्या परिस्थितीचा विचार कसा करावयास पाहिजे जे सांगण्याचा प्रयत्न आहे.

आपल्यावरुन जग ओळखावं असं म्हणतात म्हणजेच माणूस म्हणून आपण एकमेकांकडे पाहिलं तर रोते रोते हसना... ह्याची अनुभुती नक्कीच घेता येईल. घराचा कोपरा न कोपरा आनंदी राहण्यासाठी आसु आणि हसु हे गरजेचंच आहे. आपण इतरांना सहकार्य केल्यामुळे त्यांना होणार आनंद आपल्याला समाधान, आनंद मिळवुन देतं, प्रसन्नता मिळवुन देतं. खरं तर एखादा असहाय्य, गरजवंत, त्याला असणाऱ्या गरजेमुळं रडत असतो. अशावेळी आपण त्याची गरजपुर्ण केली तर तो हसु लागतो. त्याचा चेहरा आनंदी होतो. गरजवंतांच्या पाठिशी - सोबत राहाणं माणूस म्हणून हा आपला धर्म आहे.

रडता रडता हसणं हे स्वतःसाठी जेवढं महत्वाचं आहे तेवढंच इतरांसाठी चांगलं असं करणं महत्वाचं आहेच. अमिताभ, माधवी आणि मुलीवर चित्रीत झालेलं हे गाणं मानवी जीवनातली काही सत्य सांगतं. मनसोक्त रडायला सुध्दा हवं कारण दुःख मनात दाबुन ठेवणं अजिबात योग्य नाही. इतरांजवळ मन, मोकळं केलं की मन हलकं होतं, छान वाटतं. तसं हसणं सुध्दा, अगदी मनमोकळं हसणंसुध्दा चांगलं असतं. हे झालं स्वतःच्या बाबतीत माझ्यामुळे अर्थात माझ्या विचार, आचाराने सहवासात येणाऱ्यांच्या डोळ्यांत आसवं येणार नाहीत तर त्यांच्या चेहऱ्यावर हास्य येईल हा विचार, कृती रोते रोते हसना सिखो चा खरा अर्थ सांगणार आहे.

(लेख क्र.५२४)

**- सुनील राऊत** माळीगल्ली, भिंगार,
मो.९८२२७५८३८३

## आयुर्वेदिक गर्भसंस्कार

### गर्भावस्थेतील तपासण्या व लसीकरण

या महिन्यापर्यंत बाळाची फुफ्फुसे कमजोर असतात; परंतु या महिन्यात बाळाचा जन्म झाला, तर ते आय.सी.यू. मध्ये ठेवून जगू शकते. गर्भलांबी : १८ इंच, गर्भ वजन : १७०२ ग्रॅम. नववा महिना:

तस्मिन्नेक दिवसातिक्रान्तेऽपिनवमं मासं ।
उपादाय प्रसवकालं आ दशमात् मासात्।
- चरक शारीरस्थान (४-२५)

नवव्या महिन्यामध्ये गर्भाची वाढ पूर्ण होऊन गर्भ प्रसूतीसाठी तयार होतो. गर्भाच्या फुफ्फुसांची पूर्ण वाढ होऊन ते त्यांचे कार्य करण्यास सक्षम होतात. या महिन्यात गर्भाची प्रत्येक आठवड्यात अर्ध्या पौंडांनी वाढ होते. प्रसूती गर्भाच्या कोणत्या अवयवांकडून होणार ते या महिन्यात ठरते: म्हणून या महिन्यात सोनोग्राफी करून प्रसूतीच्या वेळी मातेला काही अडचण आहे का हे बघून घ्यावे,

साधारणत: बाळ डोक्याकडून बाहेर येते. गर्भलांबी : १९ ते २१ इंच, गर्भवजन : २६२२ ग्रॅम ते ३४६२ ग्रॅम. अशा तऱ्हेने गर्भाची ९ महिने शारीरिक वाढ आईच्या आरातून निर्माण होणाऱ्या रसधातूपासून होत असते.

गर्भाची मानसिक वाढ चांगली होण्यासाठी ध्यान-धारणा, मंत्रोपचार, ॐकार उपयोगी ठरतात व यातून आपण बाळासा बुध्यांक चांगल्या प्रकारे वाढवू शकतो.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००




# एन ए जागा घेताय, या गोष्टी नक्कीच तपासा

लेखक– श्री. विजय वि.उजनीमठ हे मागील दहा वर्षापासून नगर शहर व अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये रेसिडेन्शिअल, कमर्शिअल व औद्योगिक एन ए (जमीन बिनशेती) खास करून पेट्रोल पंप बिनशेतीची कामे करत आहेत. ते आर्किटेक्टस इंजिनिअर्स अॅण्ड सर्व्हेअर्स असोसिएशन अहमदनगर या नामांकित संस्थेचे आजीव सभासद आहेत.











**प्लॉट एन ए म्हणजे काय? :**

बांधकाम क्षेत्राचा उल्लेख आला की प्रत्येक व्यक्ती बिल्डिंग कन्स्ट्रक्शन, त्याचे प्लॅनिंग करणे, ३ डीडिझाईन करणे तसेच प्लॅन मंजूर करणे याचा विचार करतो. परंतु आपण जो प्लॉट घेत आहोत तो प्लॉट शेती आहे का? की बिन शेती केलेला आहे ? ते तपासून पाहणे गरजेचे आहे. कारण सध्याच्या धावपळीच्या युगामध्ये व्यक्ती प्लॉट घेत असताना फक्त प्लॉट पाहतोपरंतु त्या प्लॉटचे डॉक्युमेंट व्यवस्थित तपासून घेत नाही किंवा जो समोरचा प्लॉट विकणारा एजंट किंवा मालक यांच्यावर विश्वास ठेवून तो प्लॉट विकत घेतो. नंतर असे समजते कि त्या प्लॉटचा फक्त बिनशेती आदेश केलेला असतो परंतु त्या प्लॉटचा लेआउट मंजूर केलेला नसतो.त्यामुळे त्यांना बांधकाम परवानगीला अडचणी येतात. त्यामुळे जमीन बिनशेती म्हणजे फक्त त्या जमिनीचा बिनशेतीचा आदेश नसून त्या जमिनीचा प्लॉट प्रमाणे लेआउट मंजूर केलेला असावा. जमीन बिनशेती म्हणजे काय व त्याची बिनशेती करण्याची प्रक्रिया काय असते व किती प्रकारचे एन एअसतात हेच बऱ्याच लोकांना माहित नसते.

**एन एची आवश्यकता :** भारतातील जवळपास प्रत्येक राज्यांमध्ये एन ए ची प्रक्रिया लागू आहे. शेत जमिनीला बिनशेती नॉन अॅग्रिकल्चरल जमिनीत रूपांतरित करण्याची गरज कधी भासते? जर त्या जमिनीवर बांधकाम उद्योग व्यापार किंवा इतर कोणत्याही प्रकारच्या वाणिज्यिक उपयोग करायचा असेल तर त्याला शेतजमीन असलेली जागा बदलून नॉन अॅग्रिकल्चरल जमिनीत रूपांतरित करणे आवश्यक आहे.

**जमीन नॉन अॅग्रिकल्चरल प्रक्रियेच्या टप्प्यांची माहिती :**






अर्जाची तयारी – शेत जमीन नॉन अॅग्रिकल्चरल रूपांतरित करण्यासाठी आपल्याला सर्वप्रथम उपविभागीय अधिकारी, तहसील कार्यालय किंवा नगरपालिका कार्यालयात अर्ज करावा लागतो. त्यामध्ये आपल्याला खालील कागदपत्रांची पूर्तता करणे आवश्यक असते.

१. जमिनीचे मोजणी शीट
२. जमिनीचे खरेदीखत
३. १९३० सालापासूनचे सातबारा उतारा व फेरफार
४. सातबारा उताऱ्यावरील सहधारकांचे संमती पत्र
५. आकार बंद व गट स्कीम उतारा

हे सर्व कागदपत्रे जोडून अर्ज करावा लागतो. प्रथमतः सदर जमिन ही तात्पुरती स्वरूपात बिनशेती करावी लागते तसेच खालील विभागांचे एनओसी म्हणजेच ना हरकत दाखले घ्यावे लागतात.

१. बीएसएनएल
२. आरोग्य विभाग
३. एम एस ई बी
४. वनविभाग
५. पीडब्ल्यूडी – झेडपी
६. ग्रामपंचायत ना हरकत दाखला
७. भूसंपादन विभाग

वरील सर्व कागदपत्र व एनओसी व्यतिरिक्त काही सार्वजनिक व पर्यावरणीय धोके लक्षात घेऊन काही ठिकाणी शेत जमीन एन ए करण्यासाठी पर्यावरणीय व कायदेशीर धोके उद्‌भवू शकतात ते खालीलप्रमाणे

१. जमिनीलगत कुठली ऐतिहासिक वास्तू आहे का ते तपासून घेणे.
२. तलाव, चारी, कॅनॉल
३. इंडस्ट्रियल कंपनी
४. डिफेन्स एरिया

जी जमीन एन ए करायची आहे त्या जमिनी शेजारी वरीलपैकी काही जरी असेल तर त्या विभागाची एनओसी घेणे गरजेचे आहे व त्याचे नियम व अटीच्या अधीन राहून तो लेआउट मंजूर करणे आवश्यक आहे.

**तात्पुरती ले आउट मंजूरी :** सर्वात महत्त्वाचं म्हणजे रहिवासी लेआउट करत असताना जर त्या जमिनीलगतच्या झालेल्या लेआउट मधून जे जे रस्ते आपल्या जमिनीला जोडलेले आहेत ते सर्व रस्ते तेथेच न थांबवता ते आपल्या ले आउटमध्ये जाऊ द्यावेत. सध्याच्या काळात एन ए प्लॉटचे रेट विचारात घेतले तर सामान्य माणसाला प्लॉट घेणे सोपे राहिले नाही त्यामुळे बऱ्याच ठिकाणी आर झोन मध्ये शेत जमिनीवरच कच्चे प्लॉट पाडून पंधरा ते वीस फुटी रस्ते व ओपन स्पेस आणि अॅमेनिटी स्पेस न सोडता प्लॉट पाडले जात आहेत. परंतु यामुळे आजूबाजूला मंजूर लेआउट असताना मध्येच अशा कच्च्या लेआउटमुळे जे मंजूर लेआउटचे रस्ते आहेत ते बंद होताना दिसत आहेत त्यामुळे त्याला कुठेतरी नियम लागू केले पाहिजेत. इंडस्ट्रियल लेआउट मंजूर करत असताना त्या जमिनीच्या आजूबाजूला कुठेही रहिवास लेआउट मंजूर आहे का? किंवा रहिवास लेआउट मंजूर करत असताना त्या शेजारी इंडस्ट्रियल झोन आहे का? हे तपासून घेणे गरजेचे आहे. जेणेकरून रहिवास क्षेत्रातील लोकांना त्या इंडस्ट्रीचा त्रास होणार नाही.

अशाप्रकारे वरील सर्व गोष्टी तपासून नगर रचना कार्यालयातून लेआउट मंजूर करून त्या लेआउटची तात्पुरती ऑर्डर ही तहसील कार्यालय किंवा उपविभागीय अधिकारी यांच्याकडून मंजूर करून घ्यावी.

**अंतिम ले आउट मंजूरी :** तात्पुरत्या एन ए ची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर अंतिम मोजणी करून घ्यावी लागते. ती मोजणी झाल्यानंतर पुन्हा तहसील कार्यालय किंवा उपविभागीय अधिकारी कार्यालय, नगरपालिका या कार्यालयाकडे अंतिम ले आउट मंजूर करण्यासाठी अर्ज करून प्रत्येक प्लॉट नुसार, रस्ते, ओपन स्पेस व अॅमिनिटी स्पेस ला डीमार्केशन करून घेणे गरजेचे आहे. रहिवास लेआउट असेल तर ड्रेनेज लाईन, इलेक्ट्रिकल पोल, रस्ते करून घेणे गरजेचे आहे. हे सर्व झाल्यानंतरच नगररचना कार्यालयातून अंतिम ले आउटला मंजुरी दिली जाते. अशाप्रकारे पूर्ण नॉन अॅग्रिकल्चरल प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर जमिनीची सनद तहसिल कार्यालयातून घेऊन ती तलाठ्याकडे नोंदणीसाठी देणे गरजेचे आहे. त्यानंतर शेतजमीन ही नवीन नोंदणी नुसार एन ए केल्यामुळे बिनशेती म्हणून नोंदवले जाते. त्यानंतर त्या जमिनीवर आपल्याला वाणिज्यिक उपयोगासाठी किंवा इतर उद्देशासाठी बांधकाम सुरू करता येते.

VIJAY CONSULTANCY

**नॉन अग्रिकल्चरल प्रक्रियेचे महत्त्व :**

**१. वाढते शहरीकरण :** शहरी भागांमध्ये शेतजमीन वेगाने बदलली जाते यामुळे शहरांची वाढीची गती अधिक वेगाने होते.

**२. जमिनीचे मूल्यवर्धन :** शेत जमिनीचे नॉन ॲग्रीकल्चर रूपांतर न झाल्याने त्या जमिनीचे बाजारमूल्य वाढते. त्यानंतर त्यावर वाणिज्य किंवा निवासी प्रकल्प बनवता येते.



**३. समाज आणि अर्थव्यवस्थेला फायदा :** यामुळे स्थानिक प्राधिकरण आणि शासनाला करात्मक महसूल प्राप्त होतो तसेच नागरिकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात.

**या गोष्टी टाळाव्यात :**

इतर शासकीय विभागांप्रमाणे जागा एन ए करण्यासाठी अर्धवट तांत्रिक माहिती असलेल्या एजंटचा सुळसुळाट या विभागातही असू शकतो. अशा एजंटकडून आपले आर्थिक नुकसान तसेच मानसिक मनस्ताप होण्याची शक्यता जास्त प्रमाणात असते. यासाठी शेतजमीन एन ए करणाऱ्या भूखंडधारकाने या क्षेत्रातील तांत्रिक शिक्षण घेतलेल्या आर्किटेक, इंजीनिअर अथवा ड्राफ्टमन कडूनच प्लान करणे , प्लॉटिंग करणे आणि एन ए करून घेणे हितावह ठरते.

**महत्वाची उद्दिष्टे :**

* निसर्गाची हानी/ नुकसान कमी करण्याचा प्रयत्न.
* आपल्या जुन्या लोप पावत चाललेल्या पारंपरिक बांधकाम पद्धतीमागचे विज्ञानाचे संवर्धन.
* आरोग्यदायी जीवन जगण्याच्या दिशेने वाटचाल.
* गावामध्ये कुशल कामगार तयार करून त्यांना गावातच रोजगार मिळावा.
* निसर्गाशी एकरूप होणारी त्या ठिकाणाला अनुरूप घरे असावी.
* स्टील–सिमेंट यांचा जबाबदारीपूर्वक गरजेनुसार वापर व्हावा.
* सर्वसामान्यांमध्ये आपलंजुनंतेच सोनं आहे हे पोहचवणं आणि त्याच महत्व पटवून देणं.

– श्री. विजय उजनीमठ
आर्किटेक्चरल ड्राफ्ट्समन
(स्पेसियालायजेशन – बांधकाम मंजुरी व एन ए लायजनिंग वर्क्स)
ऑफिस पत्ता – सावित्रीबाई फुले संकुल, टीव्ही सेंटर, तहसील कार्यालयासमोर, सावेडी, अहिल्यानगर.
Email :vujanimathgmail.com
मो. नं. ९५२७७७४१८४ / ७९७२०६०१८२

आर्किटेक्टस्, इंजिनिअर्स अॅण्ड सर्व्हेअर्स असोसिएशन, अहमदनगर AESA
www.aesanagar.com

# अहिल्यानगर स्वीप समितीच्यावतीने ‘डेमोक्रसी स्टुडिओ फोटोग्राफी स्पर्धा’

## लोकशाही आणि निवडणूक प्रक्रियेवर छायाचित्रे पाठवण्यासाठी आवाहन

नगर – महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक –२०२४ मध्ये मतदार जनजागृती होऊन मतदानाची टक्केवारी वाढावी याकरिता सिद्धाराम सालीमठ जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, अहिल्यानगर यांच्या निर्देशानुसार उपजिल्हाधिकारी तथा उपजिल्हा निवडणूक अधिकारी राहुल पाटील यांच्या संकल्पनेतून जिल्ह्यातील छायाचित्रकारांसाठी डेमोक्रसी स्टुडिओ फोटोग्राफी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.



महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक –२०२४ मध्ये मतदार जनजागृती होऊन मतदानाची टक्केवारी वाढावी याकरिता जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी सिद्धाराम सालीमठ, उपजिल्हा निवडणूक अधिकारी राहुल पाटील यांच्या संकल्पनेतून जिल्ह्यातील छायाचित्रकारांसाठी डेमोक्रसी स्टुडिओ फोटोग्राफी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी स्पर्धेच्या पोस्टर विमोचन प्रसंगी जिल्हा पोलिस अधीक्षक राकेश ओला, जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, आयुक्त यशवंत डांगे आदी.

यावेळी राकेश ओला (जिल्हा पोलीस अधीक्षक), आशिष येरेकर (मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.), यशवंत डांगे (आयुक्त मनपा) आदी स्पर्धेच्या पोस्टर विमोचन प्रसंगी उपस्थित होते.

मतदानाची दृष्टी... फुलवी लोकशाहीची सृष्टी हे घोषवाक्य असलेल्या स्पर्धेचे व्यावसायिक, प्रेस फोटोग्राफर, हौशी, शालेय गट (पाचवी ते बारावी– मोबाईल फोटोग्राफी) व खुला गट (मोबाईल फोटोग्राफी) अशा पाच गटात ही स्पर्धा होणार असून लोकशाही, मतदान, निवडणूक प्रक्रिया, मतदार जनजागृती, बोटावरील लोकशाहीची शाई हे पाच विषय स्पर्धेसाठी आहेत.

स्पर्धेत सहभागी होणाऱ्या स्पर्धकांनी आपले फोटो इमेज/ पीडीएफ / डॉक्युमेंट अशा कुठल्याही स्वरूपात स्वतः च्या नाव, नंबर, पत्ता, गट तसेच फोटो स्वतःच काढलेला आहे अशा प्रतिज्ञापत्रासह ९००२ १० ९००३ या देशातील पहिल्या अहिल्यानगर स्वीप केअर व्हाट्सअप क्रमांकावर १७ नोव्हेंबर पर्यंत पाठवायचे आहेत.

एका स्पर्धकास एकापेक्षा अधिक छायाचित्रे पाठवता येतील तसेच परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील. सहभागी सर्व स्पर्धकांना सहभागाचे प्रमाणपत्र वितरित केली जाणार आहेत.स्पर्धेमध्ये आचारसंहिता नियमांचे पालन करणे आवश्यक आहे.

उपक्रमासाठी अशोक कडूस (स्वीप नोडल अधिकारी तथा शिक्षणाधिकारी), बाळासाहेब बुगे (शिक्षणाधिकारी योजना), आकाश दरेकर (उपशिक्षणाधिकारी), डॉ.अमोल बागुल (जिल्हा मतदारदूत) व सर्व स्वीप समिती सदस्य आदींचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले आहे.

# विळद पंपिंग स्टेशन वसाहतीच्या परिसरात पकडलेल्या अजगराची निसर्गात मुक्तता

नगर – नगर मनमाड रस्त्यावरील विळद येथील पंपिंग स्टेशन कर्मचारी वसाहतीत नगर मधील सर्प मित्र युसूफ खान यांनी पकडलेल्या १० फुटी अजगराची जिल्हा मानद वन्य जीव रक्षक मंदार साबळे यांनी जिल्हा उपवन संरक्षक धर्मवीर सालविठ्ठल तसेच सहायक वन संरक्षक हरी सरोदे यांच्या मार्गदर्शनानुसार निसर्गात पुन्हा मुक्तता केली.


विळद पंपिंग स्टेशन वसाहतीच्या परिसरात पकडलेल्या अजगराची निसर्गात मुक्तता करण्यात आली.

यावेळी वनरक्षक विजय चेमटे, वनरक्षक मनेष जाधव तसेच सखाराम येणारे चालक संदीप ठोंबरे आदी कर्मचारी उपस्थित होते. मुळा डॅम लगत च्या भागात मुबलक खाद्य उपलब्ध असल्याने या भागात अजगरांची संख्या मोठी आहे. भारतीय अजगर हे बिनविषारी असून १५ फुटांपर्यंत वाढते. याच्या खाद्यात छोटे सस्तन प्राणी, पक्षी यांचा समावेश होतो. तसेच पूर्ण वाढ झालेले मोठे अजगर हे शेळी, हरीण, कुत्रे, रानडुक्कर अश्या मध्यम अकराच्या प्रण्यांची सहज शिकार करतो अशी माहिती साबळे यांनी दिली. अजगरास इंग्रजी मध्ये पायथन असे म्हंटले जाते. खडकाळ माळरान, दाट झाडीचा परिसरात अजगरांचे वास्तव्य असते.

अलीकडच्या काळात शहरात भुईकोट किल्ला परिसरात अनेक भागात मोठे अजगर दिसू लागल्याने साबळे यांनी चिंता व्यक्त केली आहे. शक्यतो दाट मानवी वस्तीत हे साप आढळत नाहीत असेही त्यांनी सांगितले.

# हरियाणाचे मुख्यमंत्री नायबसिंह सैनी यांना नगरमध्ये दिली जाणार राष्ट्रीय मानवंदना

## घरकुल वंचितांना भूमीगुंठा देण्याचे जाहीर केल्याबद्दल होणार आनंदोत्सव साजरा; महाराष्ट्रात देखील योजना राबविण्याची मागणी



नगर – हरियाणामध्ये घरकुल वंचितांना भूमीगुंठा देण्याचे जाहीर करणारे हरियाणाचे मुख्यमंत्री नायबसिंह सैनी यांना रविवारी (दि.१० नोव्हेंबर) पीपल्स हेल्पलाईन आणि भारतीय जनसंसदेच्या पुढाकाराने राष्ट्रीय मानवंदना दिली जाणार आहे. घरकुल वंचितांच्या प्रश्नांची जाणीव ठेऊन त्यांनी केलेल्या घोषणेबद्दल त्यांचा तमाम घरकुल वंचितांच्या वतीने हा सन्मान दिला जाणार असल्याची माहिती अॅड. कारभारी गवळी व अशोक सब्बन यांनी दिली.

सावेडी बस स्थानक येथे सकाळी १०:३० वाजता भूमिगुंठा लोकशाही रक्षाबंधन कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. घरकुल वंचित एकमेकांच्या हातावर राष्ट्र ध्वजाचे प्रतिक असलेल्या तिरंगी धागे एकमेकांच्या हातावर बांधून व लाडू खाऊ घालून आनंदोत्सव साजरा करणार आहे.

गेली दहा वर्षे संघटनेने घरकुल वंचितांसाठी लॅण्ड व्हॅल्यू कॅप्चर योजना लागू करून प्रत्येकी एक भूमिगुंठा घर बांधण्यासाठी किंवा व्यवसायासाठी जागा मोफत द्यावी अशी मागणी सातत्याने चालू ठेवली आहे. या संदर्भात देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी व तत्कालीन भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष अमित शहा यांच्या पर्यंत प्रयत्न केले. परंतु केंद्रासह देशातील कोणत्याही राज्य सरकारला याबाबत जाग आली नाही.

देशात आर्थिक विषमता टोकाला पोहोचली आहे. काही लोकांच्या ताब्यात शहरातील अनेक हेक्टर जमीनी आहेत. तर घरकुल वंचितांना झोपड्यांमध्ये रहावे लागते, ही विषमता काही प्रमाणात तरी कमी व्हावी आणि निवाऱ्याचा मूलभूत अधिकार देशभर राबवला जावा अशी मागणी या संघटनांनी आजपर्यंत चालू ठेवली आहे. परंतु हरियाणाचे मुख्यमंत्री नायबसिंह सैनी यांनी भूमीगुंठ्याचा उपक्रम हाती घेतला आहे. त्यामुळे या संघटनांनी त्यांचा राष्ट्रीय सन्मान करण्याचे घोषित करुन महाराष्ट्र सरकारने देखील हा उपक्रम आपल्या राज्यात राबविण्याची मागणी घरकुल वंचितांच्या वतीने करण्यात आली आहे.

लोकभक्ती, ज्ञानभक्ती आणि कर्मभक्ती यांच्या तीन धाग्यातून निर्माण झालेल्या लोकशाही रक्षाबंधनाचा वापर सध्याच्या महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीत या संघटना करत आहे. त्याचा पहिला प्रयोग रविवारी केला जाणार असून, यासाठी

अॅड. कारभारी गवळी, अशोक सब्बन, प्रकाश थोरात, अशोक भोसले, वीरबहादूर प्रजापती, सुधीर भद्रे, रईस शेख, कैलास पठारे, ओम कदम आदी प्रयत्नशील आहेत.

# धनगर गल्लीत नायलॉन मांजामुळे अडकलेल्या कबुतराची केली सुटका

नगर – येथील धनगर गल्ली भागातील एका पिंपळाच्या झाडावर शुक्रवारी सायंकाळ पासून नायलॉन मांजात अडकलेल्या कबुतराची जिल्हा मानद वन्य जीव रक्षक तथा पक्षीमित्र मंदार साबळे यांनी अग्निशमन दलाच्या जवानांच्या मदतीने सुटका केली. साबळे यांना गुजर गल्ली येथील अमृता दारवेकर यांनी फोन वरून सकाळी या बाबत माहिती दिली होती. त्यांनी तात्काळ महापालिकेच्या अग्निशमन विभागाचे प्रमुख शंकर मिसाळ यांना मदतीबाबत सांगितले. साबळे तसेच अग्निशमन विभागाचे कर्मचारी चालक शुभम गावडे, फायरमन शिवा कदम, कृष्णा सांगळे, वैभव सूसे, सूरज पोकळे, दीपक गर्जे, नागनाथ नाईक यांनी त्या ठिकाणी जात उंच काठ्यांचा वापर करून त्यास खाली काढले. त्यास काढते वेळी तिथे वाढलेल्या काटेरी रान झूडपांचा या टीमला सामना करावा लागला. शहरात अद्यापही बंदी असताना पतंग उडवण्यासाठी नायलॉन मांजा वापरला जात असून असे अनेक पक्षी त्यात अडकून नाहक बळी पडत आहेत. पतंग प्रेमी व्यक्तींनी पतंग उडवताना हा मांजा वापरू नये अन्यथा विक्री करणारे व वापरणारे यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात येतील असा इशारा साबळे यांनी दिला आहे.


धनगर गल्ली भागातील एका पिंपळाच्या झाडावर नायलॉन मांजात अडकलेल्या कबुतराची जिल्हा मानद वन्य जीव रक्षक तसेच अग्निशमन दलाच्या जवानांनी सुटका केली.

# १० नोव्हेंबर रोजी आनंदधाम येथे अध्यात्मिक जगातील गुरुद्वय यांचा जन्मोत्सव कार्यक्रम





नगर – राष्ट्रसंत आचार्य सम्राट श्री आनंदऋषिजी म. यांची पावन कर्मभूमी आनंदधाम येथे नेहमी अध्यात्मिक कार्यक्रमांची पर्वणी असते. श्रध्दाळू भक्तां साठी हा आनंद महोत्सव असतो.

महाराष्ट्र प्रवर्तक श्री कुंदनऋषिजी महाराज यांच्या सानिध्यात उपप्रवर्तक श्री श्रुतमुनिजी महाराज इत्यादि संतवृंदाचा चातुर्मास अंतिम चरण मध्ये गतिमान आहे. या निमित्ताने विविध प्रकारच्या धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून भगवान महावीर स्वामींचे जीवन संदेश लोकांपर्यंत पोहोचवण्यात आले. या श्रृंखलेत जैन धर्मातील महान विभूती कर्नाटक गजकेसरी श्री गणेशलालजी महाराज यांची १४५ वी जन्म जयंती व महाराष्ट्र प्रवर्तक श्री कुंदनऋषिजी महाराज यांचा ९१ वां जन्मदिवस १० नोव्हेंबर रोजी आनंदधाम येथे साजरा करण्यात येणार आहे.

श्री गणेशलालजी महाराज यांचे जीवन तप–त्याग–संयम ने परिपूर्ण होते. आपल्या तप–जप सिध्दिने त्यांनी अनेक लोकांना संकटातून, कष्ट–पिडेतून तारले आहे. देश भर त्यांचे लाखो श्रध्दाळू भक्तगण आहेत. अशा महान विभूती संत रत्नाची १४५ वी जन्म जयंती साजरी करण्यात येणार आहे

भक्तांसाठी भगवान असलेले आचार्य भगवंत श्री आनंदऋषिजी महाराज यांचे ज्येष्ठ शिष्य रत्न महाश्रमण महाराष्ट्र प्रवर्तक श्री कुंदनऋषिजी म सा. यांचा ९१ वां जन्मदिवस साजरा करण्यात येत आहे. आचार्य भगवंतांची प्रतिमूर्ति असलेले प्रवर्तक गुरुदेव यांनी केलेली गुरुसेवा, समाज हितोपयोगी कार्य, तसेच त्यांचा मधुर शांत, सरळ स्वभाव असामान्य व अलौकिक आहे.

अध्यात्मिक जगातील या दोन गुरुद्वयांचा जन्मोत्सव साजरा करण्याचे भाग्य श्रध्दाळूं साठी आनंदाची पर्वणी आहे. हा दुग्धशर्करा योग आहे. तरी सर्व श्रावक –श्राविका बंधु – भगिनींना आवाहन आहे कि, त्यांनी सहपरिवार उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी.

१० नोव्हेंबर रोजी सकाळी ९ वाजता आनंद समवशरण, आनंदधाम येथे सदर कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे श्री वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघ, आनंदधाम, अहमदनगर यांच्या तर्फे सूचित करण्यात आले आहे.

# विधानसभा निवडणुकीत मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी महापालिकेकडून जनजागृती

## बचत गट महिला सदस्यांकडून स्वयंघोषणापत्र करत १००% मतदानाचा संकल्प



विधानसभा निवडणुकीत मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी महापालिकेकडून जनजागृतीपर एक भाग म्हणून बचत गट महिला सदस्यांकडून स्वयंघोषणापत्रक तयार करत मतदानाचा संकल्प. समवेत मनपा आयुक्त यशवंत डांगे.

नगर – विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अहिल्यानगर शहरात महानगरपालिकेच्या वतीने मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी विविध उपक्रम राबवण्यात येत आहेत. या अंतर्गत महानगरपालिकेत जिल्हा परिषद शाळा गोपाळवाडी येथील विद्यार्थ्यांनी पथनाट्य सादर करून जनजागृती केली. तसेच शहरातील विविध बचत गट, डे एनयुएलएम अंतर्गत स्थापित करण्यात आलेल्या संघाच्या सदस्यांनी शंभर टक्के मतदानाचा संकल्प करत स्वयंघोषणापत्र केले.

डे एनयुएलएम अभियान अंतर्गत स्थापित शहरातील महिला बचतगट, समानता, ज्ञानाई, सहकार नगर, कादंबरी, अंबिका वस्ती येथील संघाचे अध्यक्ष, सचिव, सदस्य तसेच सर्व पदाधिकारी, डे एनयुएलएम अभियान शहर व्यवस्थापक, समुदाय संघटक, महिला मोठ्या प्रमाणात सहभागी झाल्या होत्या.

आयुक्त यशवंत डांगे म्हणाले की, शहरातील विविध घटकातील नागरिक, संघटना, दिव्यांग बांधव, तृतीयपंथी आदींमध्ये जनजागृती करून शंभर टक्के मतदानाचा संकल्प करणारी शपथ सर्वांना दिली जात आहे. या उपक्रमांतर्गत आज जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांनी अत्यंत चांगले पथनाट्य सादर करत मतदान करण्याबाबत जनजागृती केली.

तसेच महिला बचत गट व डे एनयुएलएम अंतर्गत विविध संघांचे प्रतिनिधी, महिला, इतर सदस्य, पदाधिकारी यांनी सामूहिकपणे शंभर टक्के मतदान करण्याचा संकल्प करून तसे स्वयंघोषणापत्र तयार केले. महानगरपालिकेच्या बस सेवा देणाऱ्या बसेस, बस स्टॉप, कचरा संकलन करणाऱ्या घंटागाड्या आदींवर फलक लावून, जिंगल्स वाजवून मतदारांमध्ये जनजागृती केली जात आहे.

मतदारांकडून संकल्पपत्र भरून घेतले जात आहेत. महानगरपालिकेतील देयके, विविध पावत्यांवर वॉटरमार्क द्वारे मतदार जागृतीचा लोगो छापण्यात आला आहे. सोशल मीडियात अधिकाऱ्यांमार्फत मतदारांना मतदानासाठी आवाहन केले जात आहे. शाळा व महाविद्यालयांमध्ये विविध उपक्रम, कार्यक्रमांच्या माध्यमातून जनजागृती केली जात आहे. विविध मॉर्निंग ग्रुप मध्ये चर्चासत्र घडवून आणत वेगळ्या प्रकारे जनजागृती केली जात आहे, असेही त्यांनी सांगितले.

# मानवी हक्क अभियान शहर जिल्हा महिला अध्यक्षपदी समीना पठाण



मानवी हक्क अभियानाच्या शहर महिला आघाडी अध्यक्षपदाचे नियुक्त पत्र समीना पठाण यांना प्रदान करताना जिल्हाध्यक्ष राजेंद्र काळे. समवेत इतर पदाधिकारी.

नगर – रामवाडी येथील समीना मोसिन पठाण यांची मानवी हक्क अभियानच्या शहर जिल्हा महिला अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. जिल्हाध्यक्ष राजेंद्र काळे, शहर जिल्हाध्यक्ष अशोक भोसले व शहर उपाध्यक्ष दिलीप जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये श्रीमती पठाण यांना नियुक्तीपत्र देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाप्रसंगी शहर संघटक पोपट भोसले, नितीन चव्हाण, महेश भोसले, संजय अडागळे, रणसिंग मास्तर, सलिम मिर्झा, नामदेव अडागळे, सावित्री भोसले, मनीषा लोखंडे, वर्षा चांदणे, डॅनियल भिंगारदिवे आदी उपस्थित होते.

जिल्हाध्यक्ष राजेंद्र काळे म्हणाले की, मानवी हक्क अभियानच्या माध्यमातून समाजातील दुर्बल घटकांचे प्रश्न सोडविण्याचे सातत्याने कार्य सुरु आहे. संघटनेच्या माध्यमातून महिला व बालकांचे प्रश्न देखील सोडविण्याचे कार्य सुरु असून, महिलांचे प्रश्न गंभीर बनत असताना, त्याला वाचा फोडण्याचे व त्यांच्या हक्काची जपणुक केली जाणार आहे. यासाठी नव्याने नियुक्त करण्यात आलेल्या शहर जिल्हा महिला अध्यक्षपदाची भूमिका महत्त्वाची राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.

अशोक भोसले व दिलीप जाधव यांनी महिलांना संघटित करुन त्यांचे प्रश्न सोडविण्याचे कार्य समीना पठाण करणार असल्याची भावना व्यक्त करुन त्यांना सामाजिक कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. समीना पठाण यांनी महिलांचे विविध प्रश्न संघटनेच्या माध्यमातून सोडविण्यात येणार आहे. शहरातील प्रत्येक परिसरातून महिलांना संघटनेशी जोडले जाणार असून, त्यांच्या हक्कासाठी संघर्ष केला जाणार असल्याची भूमिका त्यांनी मांडली.

# नवनागापूरमध्ये नागरी वसाहतीत कुंटणखान्यावर पोलिसांचा छापा

## २ महिलांची सुटका, कुंटणखाना चालवणाऱ्या चौघांवर गुन्हा दाखल

नगर – नवनागापूरच्या आंधळे चौरे कॉलनीत एका घरामध्ये सुरू असलेल्या कुंटणखान्यावर स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी छापा टाकून दोन पीडित महिलांची सुटका केली. या प्रकरणी दोन महिलांसह चौघांविरूध्द एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दोघांना ताब्यात घेतले आहे. गुरूवारी (दि.७) सायंकाळी साडेपाचच्या सुमारास पोलिसांनी ही कारवाई केली.

किरण रावसाहेब जरे (वय ४०, रा. वारूळाचा मारूती, नालेगाव), बाबासाहेब प्रभाकर जाधव (वय ३६, रा. श्रीपतवाडी पारगाव, ता. शिरूर, जि. बीड, हल्ली रा. आंबेडकर चौक, सनफार्मा शाळेजवळ, बोल्हेगाव), राणी ऊर्फ ललिता बाळासाहेब ठुबे, संगीता शिवाजी जगताप (दोघे रा. आंबेडकर चौक, सनफार्मा शाळेजवळ, बोल्हेगाव) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. त्यातील किरण जरे व बाबासाहेब जाधव यांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. त्यांच्याकडून रोख रक्कम, मोबाईल, कार असा सुमारे सव्वा पाच लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे. तर तेथे आढळलेल्या २ महिलांची पोलिसांनी सुटका केली आहे.

परजिल्ह्यातील २ महिलांना राणी ऊर्फ ललिता बाळासाहेब ठुबे हिने वेश्या व्यवसायाकरिता आणले होते. तर किरण जरे व बाबासाहेब जाधव हे ग्राहक शोधून या महिलांना संगीता जगताप हिने भाड्याने घेतलेल्या रोहाऊसिंग मध्ये कारमधून घेवून जात असत. स्थानिक गुन्हे शाखेसह तोफखाना व एमआयडीसी पोलिसांच्या पथकाने बनावट ग्राहक पाठवून हा प्रकार उघडकीस आणत कारवाई केली आहे.

# तिरूपती बालाजी देवस्थानचे विश्वस्त सौरभ बोरा यांचा १० नोव्हेंबर रोजी नगरमध्ये नागरी सत्कार सोहळा



नगर – आंध्रप्रदेश येथील तिरूमला तिरूपती बालाजी देवस्थान ट्रस्टच्या विश्वस्त पदी मूळचे नगरचे सौरभ बोरा पुन्हा एकदा निवड झाली आहे. सलग तिसऱ्यांदा देशातील सर्वात मोठ्या देवस्थानच्या विश्वस्त पदी निवड झालेले बोरा हे महाराष्ट्रातील पहिलेच व एकमेव व्यक्ती आहेत. या निवडीबद्दल श्री. बोरा यांचा भव्य नागरी सत्कार सोहळा १० नोव्हेंबर रोजी सायंकाळी ७ वाजता बडी साजन मंगल कार्यालय येथे आयोजित करण्यात आला आहे.

व्यवसायानिमित्त मुंबईत वास्तव्यास असलेले श्री. बोरा हे बालाजीचे निस्सीम भक्त आहेत. त्यांनी नगरमध्ये थेट बालाजी देवस्थानच्या उत्सवमूर्ती आणुन भव्य कल्याणक सोहळा आयोजित केला होता. नगरकर भाविकांसाठी ही मोठी पर्वणी ठरली होती. नगर जिल्हा संतांची भूमी म्हणून ओळखला जातो. बोरा यांच्यावरही संतांच्या शिकवणीचा मोठा पगडा आहे. त्यामुळे सेवा करण्याची संधी म्हणून ते विश्वस्त पदाकडे पाहतात. त्यांच्या निवडीमुळे अहिल्या नगरची शान वाढली आहे. त्यांच्या भव्य नागरी सत्कार सोहळ्यास नगरकरांनी उपस्थित राहावे असे आवाहन सौरभ बोरा मित्र परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.

# माजी सैनिकाच्या जखमी पत्नीवर उपचारास 'सिव्हील'कडून हयगय

## संपूर्ण घटनाक्रमाची सखोल चौकशी करावी अन्यथा आमरण उपोषणास बसण्याचा इशारा

नगर – मारहाणीच्या घटनेत जखमी झालेल्या माजी सैनिकाच्या पत्नीच्या उपचाराबाबत सिव्हील हॉस्पिटलच्या डॉक्टरांनी हयगय केली असून, याबाबत सखोल चौकशी करून न्याय द्यावा, अन्यथा हॉस्पिटल–मध्येच आमरण उपोषण करण्याचा इशारा माजी सैनिकाची पत्नी सविता शरद कातोरे यांनी दिला आहे.

यासंदर्भात सविता कातोरे यांनी जिल्हा शल्य चिकित्सकांसह जिल्हाधिकारी व जिल्हा पोलिस अधीक्षक यांना निवेदन दिले असून, त्यात म्हटले आहे की, २ नोव्हेंबर रोजी रात्री हाणामारीत जखमी झाल्यामुळे उपचारासाठी सिव्हील हॉस्पिटलमध्ये दाखल झाले होते. डोक्याला मार लागल्यामुळे डॉक्टरांनी टाके घातले व गोळ्या देऊन घरी जाण्यास सांगितले. परंतु माझे पती ॲडमिट झाले होते त्यामुळे त्यांच्याकडे गेले असता मला चक्कर आली. पेशंटजवळ थांबण्याबाबत मी संबंधितांना विनंती केली. त्याठिकाणी चार महिला त्यांच्या पेशंटजवळ बसलेल्या असताना मला हॉस्पिटलच्या बाहेर जाण्यास सांगितले. मी परत कॅज्युल्टीत गेले व त्रास होत असल्याचे सांगितले. डॉक्टरांनी मला म्हटले की, तुम्ही ॲडमिट झाल्याने तुमचा रिपोर्ट बदलणार नाही. इथ ॲडमिट होण्याकरता जागा नाही. तुम्हाला जमिनीवर झोपावे लागेल. मला त्रास होत असल्याने मी जमिनीवर झोपण्यास तयार झाले व ॲडमिट झाले. कॉट रिकाम्या असतानाही मला शिल्लक नसल्याचे सांगण्यात आले. मी माझी एमएलसी वाचली असता त्यात डोक्याला घातलेले टाके लिहिलेले नव्हते. यावर मी विचारणा केली असता ती आम्हाला सांगता येणार नाही असे सिस्टरने सांगितले. त्यामुळे डोक्याला घातलेल्या टाक्यांचा उल्लेख एमएलसीमध्ये का केला नाही याबाबत मला प्रश्न पडला आहे. मला याबाबतची माहिती मिळाल्याशिवाय मी डिस्चार्ज घेणार नाही. मला चक्कर येत असताना व टाके पडलेले असताना डॉक्टरांनी ॲडमिट करून घेण्यास नकार दिला. कॉट देण्यासही नकार दिला. या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करावी व न्याय द्यावा. अन्यथा सिव्हील हॉस्पिटलमध्ये आमरण उपोषण करण्याचा इशारा सविता कातोरे यांनी दिला आहे.

## Format C-1

*(for candidate to publish in Newspapers, TV)*

**Declaration about criminal cases**

*(As per the judgment dated 25th September, 2018, of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No. 536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)*

**Name and address of candidate:** उत्कर्ष राजेंद्र गिते (तेलीखुंट, शेरकर गल्ली, सर्जेपुरा, नगर)

**Name of political party:** अपक्ष

*(Independent candidates should write "Independent" here)*

**Name of Election :** विधानसभा २२५

***Name of Constituency :** अहिल्यानगर (अहमदनगर)

I **Utkarsh Rajendra Gite** (name of candidate), a candidate for the abovementioned election, declare for public information the following details about my criminal antecedents:

**(A) Pending criminal cases**

| Sl. No. | Name of Court | Case No. and dated | Status of case(s) | Section(s) of Acts concerned and brief description of offence(s) |
|---|---|---|---|---|
| 1. | Chief Judicial Magistrate | 5870/23 | चालू आहे | M. G. आंदोलन |
| 2. | –''– | 282/24 | चालू आहे | प्रतिबंधक कायदा मोडल्याचा आरोप |
| 3. | –''– | 2009/23 | चालू आहे | मशिद भिंत तोडीचा आरोप |

## सायटेशन नोटीस

प्रो. फी. जमा. रु. पान में
चौ.अ.नं. ६१२०२४
दि.१७/१०/२०२४

पाथर्डी येथील तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी पाथर्डी यांचे कोर्टात

अर्जदार

श्री. महादेव मोहन नाटक रा. रांजणी ता. नगर जि. अहमदनगर

सामनेवाला

ग्रामसेवक साहेब ग्रामपंचायत कार्यालय मिरी ता. पाथर्डी जि.अहमदनगर

सदर अर्जदार हा मौजे रांजणी ता.नगर जि.अहमदनगर येथील रहिवाशी आहे. सदर अर्जदार यांचा मुलगा मिनीनाथ महादेव नाटक याचा जन्म दिनांक. ०४/०९/२०१० रोजी मौजे मिरी ता.पाथर्डी जि.अहमदनगर येथे राहात्या घरीच झालेला आहे. त्यानंतर जन्म नोंदणीबाबत ग्रामपंचायत मिरी येथे कळविले होते. परंतु ग्रामपंचायत मिरी यांचे कार्यालयात जन्म नोंदणी रजिस्टरला नोंद करण्याचे राहुन गेलेले आहे. त्यामुळे अर्जदारास त्याचे मुलाचे जन्म नोंदणी प्रमाणपत्र (जन्म दिनांक नोंदणी दाखला) मिळु शकत नाही. त्यामुळे सदर अर्जदारास शासकीय योजने कामी तसेच वेगवेगळ्या ठिकाणी अडचणींना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे अर्जदारास त्याचे मुलाची जन्म दिनांकाची नोंद ग्रामपंचायत मिरी यांच्या जन्म नोंदणी रजिस्टरला नोंद घेऊन तसा दाखला मिळणे न्यायाचे व गरजेचे आहे. सदरचा दाखला हा शासकिय कामासाठी आवश्यक आहे.

सदर अर्जदार याने ग्रामपंचायत मिरी येथे जावुन जन्म प्रमाणपत्राबाबत मागणी केली असता जन्माची नोंद नसल्याने त्या कार्यालयात जन्माची नोंद नसलेबाबत दिनांक.०६/०२/२०२४ रोजीचा दाखला सदर अर्जदारास देण्यात आलेला आहे.

जन्माच्या १ वर्षाच्या आत मध्ये जन्म नोंदणी न झाल्यास केवळ तालुका दंडाधिकारी यांच्या आदेशानेच नोंद घेता येवु शकते अशी माहिती अर्जदारास ग्रामपंचायत मिरी येथे देण्यात आलेली आहे. अशा परिस्थिती मध्ये सदर अर्जदाराची जन्म नोंद जन्म रजिस्टरला होणे न्यायाचे व जरुरीचे आहे. त्याकरिता योग्य तो आदेश मिळणेसाठी प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराने मे. कोर्टात दाखल केलेला आहे. त्यापेक्षा सदरहु अर्जदाराने सदरहु जन्म मृत्यु नोंदणीबाबत कोणास काही एक म्हणावयाचे असेल तर ह्या जाहीर नोटीसीच्या तारखेपासून १५ दिवसांचे आत दिनांक. ०२/११/२०२४ पुर्वी त्याने या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्या तर सदरहून कोर्ट अर्जदार यांचे हक्काबदल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा. हक्क शाबीत दिल्यास जन्म नोंद घेणेबाबत आदेश करतील.

आज दिनांक. १७/१०/२०२४ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी नोटीस दिले असे.

हुकुमावरुन

तहसिलदार तथा
तालुका दंडाधिकारी पाथर्डी

# रात्रीच्या वेळी संशयितरित्या फिरणाऱ्या चौघांना पकडले

## एमआयडीसी परिसरात पोलिसांची कारवाई, २ दुचाक्या जप्त

नगर – एमआयडीसी परिसरात रात्रीच्या वेळी संशयितरित्या फिरणाऱ्या चौघांना दोन दुचाकी व कॉपर धातूची केबल असा १ लाख १ हजार ७५० रूपये किंमतीच्या मुद्देमालासह एमआयडीसी पोलिसांनी पकडले आहे. पोलीस अंमलदार सुरेश सानप यांच्या फिर्यादीवरून त्यांच्याविरूध्द पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अजिनाथ नानासाहेब आंधळे (वय ३६, रा. चांदा, ता. नेवासा), अजय सतीष साळवे (वय ३४, रा. खोसपुरी ता. नगर), बादशाहा अब्दुल खान (वय २९, रा. आंधळे चौरे, नवनागापूर), साहिल अकबर खान (वय ३३, रा. साईराजनगर) अशी पकडलेल्या चौघांची नावे आहेत. सहायक पोलीस निरीक्षक माणिक चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली एमआयडीसी पोलीस गुरूवारी (दि.७) रात्री हद्दीत गस्त घालत असताना हॉगनस कंपनी, अग्निशामक कार्यालया जवळ चौघे संशयितरित्या मिळून आले.

त्यांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडे दुचाकी (क्र. एमएच १६ ए डब्ल्यू ०६८८), विना नंबरची दुसरी दुचाकी व कॉपर धातुची तीन किलो ५०० ग्रॅमची वायर मिळून आली. पोलिसांनी याबाबत चौकशी केली असता त्यांना काही एक उत्तर देता आले नाही. दुचाकीचे कागदपत्रे त्यांच्याकडे नव्हती. त्यानंतर पोलिसांनी सर्व मुद्देमालासह चौघांना ताब्यात घेतले. त्यांच्याविरूध्द पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस अंमलदार चौधरी करत आहेत.


आपण आजारी नसतानाही



हात–पाय गळून जाणे.
अंग दुखणे, पाठ दुखणे.
कंबर दुखणे, थकवा येणे.
कामाचा उत्साह नसणे.
अशक्तपणा वाटणे.

सर्व आजारांसाठी ॲडमिट सुविधा उपलब्ध.
सर्व नामांकित कंपन्यांचे कॅशलेस सुविधा उपलब्ध.

डॉ.सौ. उर्मिला गिते
या सर्व तक्रारींवर खात्रीशीर सामाजिक जाणिवेतून मोफत सल्ला व शिबिर
अक्षय मुलांचे हॉस्पिटल व प्रसुतिगृह
बालिकाश्रम रोड, अ.नगर.
मो. 9422740888



टिप : मुव्ही–शो च्या वेळा बदलु शकतात
दिनांक : 31 ऑक्टोबर ते 7 नोव्हेंबर 2024



SINGHAM AGAIN
08:00AM | 11:00AM | 02:00 PM
05:00PM | 05:30PM | 08:00 PM
11:00 PM

BHOOL BHULAIYAA 3
08:00AM | 09:00AM | 10:45 AM
12:00 PM | 01:30 PM | 02:45 PM
04:30 PM | 07:30 PM | 08:30 PM
10:30 PM | 11:15 PM

- For Screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher*
- Offer Valid On Window Booking & Phone Booking

Ahmednagar's First & Most Luxurious Cinematic Paradise !
AVAILABLE ON bookmyshow
CONNPLEX SMART THEATRE
AVAILABLE ON bookmyshow
3rd Floor, Kohinoor Mall, Premdan Chowk, Savedi, A.Nagar
Mo. 6353564618 / 7790094001




## मूत्रपिंडाची समस्या असेल तर...

लाईफस्टाईल

मूत्रपिंडांशी संबंधित व्याधी असणाऱ्यांना प्रथिनयुक्त पदार्थ न खाण्याचा सल्ला दिला जातो. पण याबाबत रुग्णांचा बराच गोंधळ उडाल्याचं दिसतं. मूत्रपिंडाच्या समस्या असणाऱ्यांनी काय करायला हवं याविषयी...

तीव्र स्वरूपाचा मूत्रपिंडविकार असलेल्या पण डायलिसिसची गरज नसलेल्या रुग्णांच्या आहारातलं प्रथिनांचं प्रमाण मर्यादित असायला हवं. पण डायलिसिसवर असलेल्या रुग्णांना प्रथिनांच्या सेवनाच्या बाबतीत थोडी सवलत मिळू शकते.



'रेनल डाएट' या प्रकारात मांस, सोया प्रथिनं, अंडी, सुक्या मेव्यातून मिळणारी प्रथिनं तसंच बीन्स यांचा समावेश असतो. दुग्धजन्य पदार्थांमध्ये पोटॅशियम आणि फॉस्फरसचं प्रमाण जास्त असल्यामुळे त्यांचं प्रमाण मर्यादित असायला हवं. मूत्रपिंडाचं आरोग्य जपण्यासाठी भरपूर पाणी पिण्याचा सल्ला तज्ज्ञ देतात. पोषक घटक आणि जीवनसत्त्वांनी युक्त संतुलित आहार ही निरोगी आयुष्याची गुरूकिल्ली आहे. मूत्रपिंडाच्या आरोग्यासाठीही हेच तत्त्व लागू पडतं. यासोबत वजन नियंत्रणात ठेवणं आणि नियमित आरोग्य तपासणीही गरजेची आहे.

## कंडोम वापरण्याने पुरुषांना कर्करोग

कोणत्याही प्रकारचे लैंगिक आजार टाळण्यासाठी कंडोम वापरण्याचा सल्ला दिला जातो. लैंगिक संक्रमित रोगांपासून स्वतःचे संरक्षण करण्यासाठी लोक कंडोम वापरतात. नको असलेली गर्भधारणा टाळण्यास कंडोम मदत करते; पण आता कंडोमच कर्करोगाचे कारण बनत आहे. एका संशोधनातून धक्कादायक गौप्यस्फोट करण्यात आल्याने कंडोमच्या संदर्भात लोकांमध्ये एक नवीन चिंता निर्माण झाली आहे.

अलीकडेच, अमेरिकेतील एका सर्वोत्तम कंडोमवर कर्करोगजन्य असल्याचा दावा दाखल करण्यात आला. या प्रकरणात, कंडोममध्ये कर्करोग निर्माण करणारे विषारी रसायन 'पीएफएएस'चे घटक असल्याचे म्हटले जाते. अमेरिकेतील नंबर-१ कंडोम म्हणवल्या जाणाऱ्या ट्रोजन कंडोममध्ये कॅन्सर निर्माण करणारी विषारी रसायने असल्याचे म्हटले आहे. मॅथ्यू गुडमन यांनी मॅनहॅटन फेडरल कोर्टात हा खटला दाखल केला. त्यांनी आरोप केला, की ट्रोजन अल्ट्रा थिन कंडोममध्ये पॉलीफ्लोर अल्काइल पदार्थ असतो. तो 'पीएफएएस'चा घटक असतो. हे आरोग्यासाठी हानिकारक मानले जाते. हा पदार्थ पर्यावरणात आणि मानवी शरीरावर दीर्घकालीन स्थिरतेसाठी ओळखला जातो. हे नॉन-स्टिक आणि जेल बेससाठी वापरले जाते.



याचिकाकर्त्याच्या म्हणण्यानुसार, ट्रोजन अल्ट्रा थिन कंडोमची प्रयोगशाळेत चाचणी करण्यात आली होती. त्यात असे आढळून आले, की त्यात सेंद्रिय फ्लोरिन आहे ज्यावर पीएफएएस चिन्हांकित आहे. ही सर्व माहिती कंडोमच्या पाकिटावर दिलेली नाही. ती दिली असती, तर त्यांनी तो कंडोम विकत घेतला नसता किंवा त्यासाठी कमी किंमत दिली असती. या प्रकरणाबाबत त्यांनी न्यायालयाला कंपनीकडून त्या कंडोमच्या देशभरातील सर्व खरेदीदारांना ५ दशलक्ष डॉलर्सची भरपाई देण्याची मागणी केली आहे.

'पीएफएएस' हा एक प्रकारचा पदार्थ आहे, ज्यामुळे कर्करोग होतो असे आढळले आहे. हे बाळाच्या जन्माच्या वेळेस कमी वजन आणि कमकुवत प्रतिकारशक्तीशी संबंधित मानले जाते. एका अभ्यासात कंडोम आणि त्यातील लुब्रिकेंट्सची तपासणी करण्यात आली. ट्रोजन अल्ट्रा थिन कंडोमसह प्रमाणित प्रयोगशाळेत २९ वेगवेगळ्या कंडोम नमुन्यांची चाचणी घेण्यात आली. तपासणीत असे दिसून आले, की २९ उत्पादनांपैकी १४ टक्क्यांमध्ये काही 'पीएफएएस' कण आढळले. 'पीएफएएस' असलेले अंदाजे ३ कंडोम होते आणि २ कंडोममध्ये त्यांच्या लुब्रिकेंट्समध्ये 'पीएफएएस' कण आढळले. हे रासायनिक कण कंडोम गुळगुळीत आणि स्टेन रेजिस्टेंस बनवण्यासाठी वापरले जातात.

## ठराविक रक्तगटाच्या लोकांना ब्रेन स्ट्रोक

ब्रेन स्ट्रोक हा एक गंभीर आजार आहे. त्यामुळे मृत्यूचा धोका जास्त असतो. एका नवीन अहवालानुसार, एका विशेष रक्तगट असलेल्या लोकांना अकाली 'ब्रेन स्ट्रोक' होण्याची शक्यता असते. बऱ्याचदा, ६० वर्षांनंतरच्या लोकांना मेंदूचा झटका येतो; परंतु काही रक्तगटाच्या लोकांना कमी वयातही स्ट्रोक येऊ शकतो. यासंदर्भात 'युनिव्हर्सिटी ऑफ मेरीलँड स्कूल ऑफ मेडिसिन'च्या संशोधकांनी हे संशोधन केले. त्यात त्यांनी गेल्या ४८ वर्षांचे रेकॉर्ड तपासले. संशोधनात जुन्या कागदपत्रांची तपासणी केल्यानंतर असे आढळून आले, की ए रक्तगटाच्या लोकांना लहान वयातच ब्रेन स्ट्रोकचा धोका संभवतो. या चाचणीत सुमारे सहा लाख लोकांमध्ये असाच प्रकार दिसून आला आहे. संशोधकांनी असेही निरीक्षण केले आहे, की ए रक्तगट असलेल्या लोकांना इतर रक्तगटांच्या तुलनेत जास्त धोका असतो. वेगवेगळ्या रक्तगटानुसार रोगांचा धोकादेखील बदलू शकतो. 'ब्रेन स्ट्रोक' हा एक गंभीर आजार आहे. रक्तगट ए असलेल्या लोकांना ब्रेन स्ट्रोकचा धोका जास्त असतो, असे या नवीन संशोधनातून समोर आले आहे.



## पुरुषांपेक्षा महिलांमध्ये हिमोग्लोबीनचे प्रमाण कमी

आजकाल महिला पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून करिअर करत आहेत. चूल आणि मूलसोबत महिला इतर अनेक जबाबदाऱ्या पार पाडताना दिसतात; मात्र यामुळे स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करताना दिसतात. त्याचा परिणाम विविध शारीरिक आणि मानसिक आजारांचा सामना करावा लागतो. थकवा, अशक्तपणा, रक्ताच्या अभावामुळे शरीर गंभीर आजारांच्या प्रभावाखाली येऊ शकते.

कमी आयर्न म्हणजेच लोह आणि हिमोग्लोबिनमुळे उद्भवणाऱ्या रोगास अशक्तपणा म्हणतात. अशक्तपणा, रक्ताचा अभाव ही एक गंभीर स्थिती आहे. त्याची प्रकरणे भारतात अधिक आढळतात. सर्वात चिंतेची गोष्ट म्हणजे ती स्त्रियांमध्ये अधिक आहे. शरीराचा प्रत्येक भाग रक्ताने एकमेकांशी संपर्क साधतो. रक्ताच्या प्रमाणात ऑक्सिजनचा पुरेसा पुरवठा चांगला असतो; परंतु तरीही भारतातील स्त्रियांना सर्वाधिक अशक्तपणाचा अधिक त्रास जाणवत आहे. भारतीय महिलांमध्ये अशक्तपणाचे एक कारण म्हणजे पोषक तत्वांचा अभाव. ग्रामीण भागात स्त्रियांमध्ये अशक्तपणाची अधिक प्रकरणे आहेत, कारण त्यांना भरपूर अन्न मिळत नाही.



बऱ्याच स्त्रिया शाकाहारी अन्नावर अवलंबून असतात. त्यामुळे लोहाची कमतरता वाढू शकते, कारण नॉनव्हेजमध्ये असलेला लोह वनस्पती-आधारित पदार्थांमध्ये त्या तुलनेत कमी असतात. शरीरात व्हिटॅमिन बी -१२ सारखे इतर कोणतेही घटक कमी असतील तर शरीरात रक्ताचा अभाव असू शकतो. व्हिटॅमिन बी -१२ कमी केल्याने गंभीर रोग होऊ शकतात, त्यापैकी एक अशक्तपणा.

गर्भधारणेदरम्यान हिमोग्लोबीन कमी होणे स्वाभाविक आहे. काही स्त्रियांमध्ये प्रसूती दरम्यान अधिक रक्त बाहेर येते. त्यामुळे अशक्तपणा येऊ शकतो. मासिक पाळी दरम्यान काही स्त्रियांना रक्तस्राव होतो, अशा स्त्रियांना रक्त कमी होण्याचा धोका असतो. ज्या महिलांना या दिवसात जास्त रक्तस्राव झाला आहे, त्यांना डॉक्टरांचा सल्ला घ्यावा लागतो.

## रक्तगट सांगतो स्वभाव!

आरोग्यवेध

लग्न जुळवताना आपण पत्रिकेचा आधार घेतो. ग्रह, तारे, नक्षत्र अनुकूल असतील तर लग्न ठरवतो. पण जपानमधले लोक असं करत नाहीत. स्वभाव जुळवण्यासाठी किंवा जाणून घेण्यासाठी ते रक्तगटाचा अभ्यास करतात. रक्तगटावरून माणसाचा स्वभावही कळू शकतो. रक्तगटाद्वारे स्वभाव जाणून घेण्याच्या या प्रक्रियेला जपानी भाषेत 'केटसुईकी गाटा' असं म्हणतात. जपानी प्राध्यापक तोकेजी फुरूकावा यांच्यामुळे १९३० पासून हा शब्द प्रचलित झाला. रक्तगटावरून स्वभाव जाणून घेता येतो असा दावा त्यांनी केला होता.

ए,बी,ओ आणि एबी हे प्रमुख रक्तगट आहेत. अँटीजेन्सच्या आधारे त्यांचं वेगळेपण ठरतं. लाल रक्तपेशींच्या पृष्ठभागावर हे अँटीजेन्स असतात. त्यावरून आपल्या रोगप्रतिकारक शक्तीची क्षमता कळते. जपानी लोक इतरांना त्यांची रास नाही तर रक्तगट विचारतात. कारण रक्तगटावरून माणसाचा स्वभाव कळतो यावर त्यांचा पूर्ण विश्वास आहे. अर्थात अशाप्रकारच्या विचाराला कोणताही शास्त्रीय आधार नाही. मात्र रक्तगटावरून केलेलं स्वभावाचं वर्णन तंतोतंत जुळत असल्याचं काहींचं म्हणणं आहे.

त्यामुळे प्रत्येक रक्तगटाशी संबंधित स्वभाव वर्णन जाणून घेणं रंजक ठरेल. ए रक्तगट असणाऱ्यांचा स्वभाव संवेदनशील असतो. ही मंडळी मदतीला तत्पर असतात. ती बरीच भावनिक आणि हुशारही असतात. हे लोक शांतताप्रिय असल्याने त्यांना इतरांशी भांडायला आवडत नाही. अतिसंवेदनशीलता हा त्यांचा अवगुण आहे असं म्हटलं जातं. समाजाने घालून दिलेले नियम मोडायला त्यांना सहसा आवडत नाही. या रक्तगटाचे लोक पटकन ताण घेतात. यामुळे त्यांच्या शरीरात कॉर्टिसोल या हार्मोनचं प्रमाणही बरंच जास्त असतं.




बी रक्तगटाची माणसं कुशल आणि निर्णयक्षम असतात. ती अगदी पटकन निर्णय घेऊन मोकळी होतात. त्यांची इच्छाशक्ती खूप तीव्र स्वरूपाची असते. पण एकाच वेळी अनेक गोष्टी करण्याची वेळ आली तर ती पुरती गडबडतात. काही वेळा ही माणसं स्वार्थीपणा करतात. सहकार्य करत नाहीत.

एबी रक्तगटाच्या माणसांमध्ये ए आणि बी अशा दोन्ही रक्तगटांचे गुण असतात. त्यांचा स्वभाव थोडा गुंतागुंतीचा असतो. कधी ते आक्रमक असतात तर कधी लाजरेबुजरे वाटतात. पण ते लोकांसोबत पटकन मिसळतात. कोणाशीही पटकन मैत्री करू शकतात. त्यांना ताण हाताळता येत नाही. अनेकदा त्यांची वर्तणूक बेजबादार असते.

ओ रक्तगटाची माणसं धाडसी असतात. उच्च दर्जाचं काम करायला त्यांना खूप आवडतं. ही माणसं हुशार, प्रेमळ असतात. जपानमध्ये ओ रक्तगटाच्या माणसांना लढवय्ये समजलं जातं. पण त्यांच्या मनात थोडी असूया असते. या लोकांना सच्चेपणा आवडतो. त्यामुळे खोटं वागणाऱ्या लोकांचा त्यांना खूप राग येतो. ही माणसं काहीशी उद्धट आणि स्वमग्न असतात. हे लोक थोडे कठोरही असतात.

## ई सिगारेट्स ठरतील धोकादायक

नवसंशोधन

अनेक जण इलेक्ट्रॉनिक सिगारेट्स म्हणजे ई सिगारेट्सचा वापर करतात. मात्र या सिगारेट्समधून 'मायक्रोबायल टॉक्सिन्स' बाहेर पडतात, असं शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे. अशा सिगारेट्सच्या वापरामुळे श्वसनाशी संबंधित रोग उद्भवू शकतात. अस्थमा, फुफ्फुसाची क्षमता कमी होणं, फुफ्फुसाचा दाह अशा समस्या यामुळे निर्माण होण्याची शक्यता असते. या संशोधनासाठी इंग्लंडमधल्या हॉवर्ड विद्यापीठाने ई सिगारेट्सच्या ७५ उत्पादनांचा अभ्यास केला. यातल्या २७ टक्के उत्पादनांमध्ये एंडोटॉक्सिनचे अंश आढळून आले. एंडोटॉक्सिन म्हणजे एकप्रकारचं मायक्रोबायल आहे. तसंच यात ग्लुकॅनचे अंशही सापडले. हे ग्लुकॅन बऱ्याच फंगसच्या शरीरात असतं. यावरूनच ई सिगारेट्सची दाहकता आपल्या लक्षात येऊ शकते.



## दिवसभर घ्यायला हवी काळजी

दंतारोग्य

दिवसातून दोन वेळा दात घासण्याचा सल्ला दिला जातो. मात्र या दरम्यानच्या काळात आपलं दातांच्या स्वच्छतेकडे पूर्ण दुर्लक्ष झालेलं असतं. मधले १२ ते १५ तास आपण दातांकडे बघतही नाही. तोंडाची स्वच्छता राखण्यासाठी फक्त दोनवेळा दात घासणं पुरेसं नाही. दिवसभरातही तोंडाची विशेष काळजी घ्यायला हवी. दिवसभराच्या खाण्यानंतर दातांच्या फटीत अडकलेले अन्नकण त्रासदायक ठरू शकतात. तोंडाच्या दुर्गंधीमुळे इतरांना त्रास होऊ शकतो. हे टाळण्यासाठी काहीही खाल्ल्यानंतर चूळ भरा. जेवणानंतर माउथ फ्रेशनर चघळा. बडिशेप, सुपारीचा पर्यायही आहे. गोड पदार्थ जेवणासोबत खा. जेवणानंतर थोडं चीज खा. यामुळे तोंडातल्या लाळेचं प्रमाण वाढतं.



## डोळ्यांशी संबंधित गैरसमज

डोळ्यांचं आरोग्य

डोळ्यांच्या आरोग्याशी संबंधित अनेक समज गैरसमज आहेत. अंधारात वाचन केल्याने डोळ्यांना त्रास होतो असं म्हटलं जातं. प्रकाशात वाचन करणं अधिक सुलभ असलं तरी कमी प्रकाशात वाचल्याने डोळ्यांवर दुष्परिणाम होत नाहीत. वाढत्या वयामुळे निर्माण होणाऱ्या डोळ्यांशी संबंधित समस्यांना प्रतिबंध करता येत नाही असाही एक समज आहे. मात्र मोतीबिंदूची समस्या दूर करता येते. सर्वसाधारण आरोग्य सूचनांचं पालन करून आपण डोळ्यांच्या विकारांना आळा घालू शकतो.



## ठसका हिरव्या मिरचीचा

आजीबाईचा बटवा

उन्हाळ्यात आपण आईसक्रीमसारखे थंड पदार्थ खातो. प्रत्यक्षात आईसक्रीम गरम असतं. या दिवसात मसालेदार, तिखट फार खाल्लं जात नाही. मात्र उन्हाळ्यात हिरवी मिरची खाल्ल्याने लाभ होऊ शकतात. हिरव्या मिरचीत अँटी ऑक्सिडंट्स आणि पचनाला उपयुक्त ठरणारे फायबर भरपूर प्रमाणात असतात. त्यामुळे अन्नपचन सुलभ पद्धतीने होतं. गॅस, अपचन, बद्धकोष्ठता अशा विकारांमध्ये हिरवी मिरची गुणकारी ठरते. यातल्या बॅक्टेरियाविरोधी गुणधर्मामुळे शरीरातले बॅक्टेरिया नष्ट होतात. रोगप्रतिकारक शक्ती वाढते. जंतूसंसर्गाची समस्या कमी व्हायला मदत होते. मधुमेहींनी हिरवी मिरची खायला हवी.



## रिकाम्या पोटी कॉफी पिताय?

आपण कुठे चुकतो?

सकाळी उठल्यावर कॉफीचा घोट घेतल्याशिवाय अनेकांना चैन पडत नाही. पण रिकाम्या पोटी कॉफी प्यायल्याने बऱ्याच समस्या निर्माण होऊ शकतात. कॉफी आरोग्यदायी असल्याचे दावे केले जात असले तरी ती रिकाम्या पोटी प्यायल्याने पचनसंस्थेवर विपरित परिणाम होऊ शकतात. कॉफीमध्ये कॅफेन भरपूर प्रमाणात असतं. त्यामुळे सकाळी उठल्यावर कॉफी प्यायल्यामुळे आम्लांची निर्मिती होऊन पोटातल्या आतल्या भागातल्या आवरणाला धोका निर्माण होतो. अपचन, छातीत जळजळ अशा समस्याही यामुळे निर्माण होऊ शकतात.

सकाळी उठल्यानंतर ब्लॅक कॉफी पिणाऱ्यांची ॲसिडिटी वाढू शकते. थोड्या प्रमाणात दूध आणि साखर घातलेली कॉफी सकाळी चालू शकते. पण त्याचं प्रमाण मर्यादित असावं असं तज्ज्ञ सांगतात.



ॲसिडिटी आणि गॅसच्या समस्या असलेल्यांनी रिकाम्या पोटी कॉफी पिणं टाळावं. कॉफी पिण्याआधी दोन मल्टीग्रेन बिस्किटं किंवा थोडे भिजवलेले बदाम खावेत. गरोदर महिला तसंच विशिष्ट औषधांचं सेवन करणाऱ्यांनीही सकाळची कॉफी टाळावी.

सकाळी कॉफी घेतल्याने शरीरातल्या 'कॉर्टिसोल' या हार्मोनचं प्रमाण कमी होत असल्याचं काही संशोधनांमधून समोर आलं आहे. कॉर्टिसोलचं प्रमाण कमी झाल्याने झोप येते. व्यायामाआधी कॉफी पिणंही चुकीचं आहे.

## उपयुक्त आयुर्वेदिक तेलं

आयुर्वेद आणि विकार

आयुर्वेदात विविध तेलांचं महत्त्व सांगण्यात आलं आहे. आरोग्य राखण्यासोबतच सौंदर्यवृद्धीसाठीही ही तेलं उपयोगी पडतात. या औषधी तेलांचा वापर ॲरोमा थेरपी तसंच निसर्गउपचारांमध्येही केला जातो. अशाच काही औषधी तेलांविषयी जाणून घेऊ या.

लवेंडर तेल बहुगुणी आहे. त्वचेचं आरोग्य राखण्यात लवेंडर तेलाची महत्त्वाची भूमिका असते. या तेलामुळे फक्त सौंदर्यवृद्धी होते असं नाही तर जखम भरून काढण्यासाठीही याचा वापर केला जातो. भाजलेल्या भागावर लवेंडर तेल लावल्याने आराम मिळतो. याच्या वासामुळे मानसिक शांतता लाभते. ताण कमी होतो. शांत झोपही लागते. त्यामुळे ॲरोमा थेरपीत लवेंडर तेलाचा वापर केला जातो.



त्वचा, केस आणि नखांच्या आरोग्यासाठी टी ट्री ऑईलचा वापर केला जातो. पिंपल्समुळे चेहऱ्यावर पडलेले डाग यामुळे दूर होतात. हे तेल केसांनाही लावता येतं. त्वचा विकारांवरही हे तेल प्रभावी ठरतं.

चंदनाच्या तेलाचा वापर प्राचीन काळापासून केला जात आहे. या तेलाच्या नियमित वापरामुळे त्वचेचं सौंदर्य खुलतं. अँटीसेप्टिक तसंच दाह कमी करण्यासाठीही त्याचा वापर होतो. ताणतणाव कमी करण्याठी लेमन ग्रास तेल वापरायला हवं. निद्रानाश, डोकेदुखी, उच्च रक्तदाब अशा विकारांमध्येही हे तेल प्रभावी ठरतं. गुलाबाच्या तेलामुळे हार्मोन्सचं संतुलन राखलं जातं. गुलाब तेलाने मसाज केल्यानंतर शरीराला आराम मिळतो.

## वंध्यत्व दूर करण्यासाठी...

व्याधी विचार

वंध्यत्वाची समस्या अनेकींना भेडसावते. आईवडिल होण्याची स्वप्नं रंगवणाऱ्या जोडप्यांना यामुळे खूप धक्का बसतो. वारंवार प्रयत्न करूनही गर्भधारणा न होणं म्हणजे वंध्यत्व. चुकीची जीवनशैली हे सध्याच्या काळात वंध्यत्वा प्रमुख कारण म्हणून समोर आलं आहे. ताणतणावांमुळे गर्भधारणेत अडचणी येऊ शकतात. खूप ताण येणं आणि प्रत्येक गोष्टीची काळजी करत रहाणं यामुळे ताणाची पातळी प्रचंड वाढते. मद्यपान, धूम्रपान अशी कारणंही यामागे असू शकतात.

नोकरी करणाऱ्या बऱ्याच महिलांची खूप दगदग होते. काम आणि घर सांभाळताना होणारी धावपळ, येणारा प्रचंड ताण, जबाबदाऱ्यांचं ओझं पेलताना होणारी चिडचिड हे सुद्धा वंध्यत्वाला कारणीभूत ठरू शकतं. माहिती-तंत्रज्ञानासारख्या क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांना रात्रपाळीही असते. रात्री जागरण करून पुन्हा सकाळी लवकर मिटिंगलाही जायचं असतं. अशा परिस्थितीत



अपुऱ्या झोपेचेही आरोग्यावर विपरित परिणाम होतात. धावपळीच्या क्षेत्रात काम करणाऱ्यांचं जेवणही वेळेवर होत नाही. जंक फूड, चहा, कॉफीचा अतिरेक होतो. या अशा जीवनशैलीमुळे स्थूलपणा वाढतो आणि याची परिणती वंध्यत्वात होते.

ताण वाढला की शरीरात विशिष्ट प्रकारचे हार्मोन्स स्त्रवायला सुरूवात होते. त्यामुळे सतत खावंसं वाटतं. अतिखाणं आणि जंक फूडच्या माऱ्यामुळेही खूप त्रास होतो. सततचा ताण स्थूलपणाला कारणीभूत ठरतो. यामुळे गर्भायशात बीजांडांची निर्मिती होण्यात अडथळे येतात. मासिक पाळी अनियमित होते. चुकीच्या जीवनशैलीचा फक्त महिलांच्या शरीरावर परिणाम होतो असं नाही. पण पुरूषांनाही याचा त्रास होऊ शकतो. सतत जंक फूड खाणाऱ्या पुरूषांमधल्या शुक्राणूंच्या संख्येत घट झाल्याचं आढळून आलं आहे.

ही समस्या सोडवण्यासाठी सहा ते आठ तासांची शांत झोप घेणं गरजेचं आहे. झोपण्याआधी व्यावसायिक ई मेल्स तपासू नयेत. तसंच कामाशी संबंधित फोनही घेऊ नयेत. धूम्रपान,मद्यपानासारखी व्यसनं सोडायला हवी. ताण कमी करण्यासाठी चांगले छंद जोपासा. आवडीच्या गोष्टींमध्ये वेळ घालवा. घर आणि काम यात संतुलन साधण्याचा प्रयत्न करा. वैयक्तिक आणि व्यावसायिक आयुष्याची सरमिसळ करू नका.

## 'सिद्धार्थ वाणी'

उपप्रवर्तक श्री सिद्धार्थमुनीजी म.सा. तथा महासतीजी डॉ. सौम्याश्रीजी म.सा. आदि ठाणा ३ इनका चातुर्मास सावेडी स्थानक मे विराजमान है ।



### श्रद्धा आणि सबुरी

परमेश्वराने दिलेली छोटी सूत्रे जीवनाच्या उभारणीत आणि विकासात मदत करतात. त्यांच्याद्वारे आत्मा शुद्ध होतो. माणूस जितका संयम दीपात ठेवतो, तितका तो यशस्वी होतो. जेव्हा एखाद्या झाडाचे (रोपाचे) रुपांतर झाडात होते, तेव्हा तो वेळ मागतो. मुलाच्या जन्मानंतर ती हळूहळू तिथे पोहोचली. ते अभिवृद्धि उद्‌भवते, तो पायाने चालायला शिकतो, नंतर हळूहळू पुढे जातो. जर तुम्हाला सर्व काही एका दिवसात हवे असेल तर ते तुम्हाला मिळत नाही. जीवन चालत नाही. मुलाला मोठे होण्यासाठी आणि जगाच्या गतीशी जुळवून घेण्यासाठी साधारणपणे अकरा वर्षे लागतो. संयमाचा सूर्य उगवतो. माणूस भाग्यवान होतो, पण हे केव्हा जेव्हा संयम ठेवतो तेव्हा.

पण आजच्या पिढीकडे संयमाचा अभाव आहे. समज वाढली, चिंता, आक्रस्ताळेपणा आणि अस्वस्थता एवढी वाढली आहे, की समजून घेऊनही चांगले परिणाम मिळतन नाही. एक कथाद्वारे पाहू :- एका कुटुंबात एक तरुण त्याच्या पहिल्याच दिवशी एका कंपनीत नोकरीला जाऊ लागला. त्याच्या आईने त्याला समजावले की मुलाला धीर धर. सर्व काम संयमाने करा. मुलाने एकदा ऐकले, दोनदा ऐकले व तो ऐकतच होता. त्याने आईचे म्हणणे टाळले नाही व त्याने आईची शिकवण अमलात आणली आणि तो आयुष्यात यशस्वी झाली आणि एक दिवस मोठा माणूस बनला हेच सबुरी ठेवल्याने तो यशस्वी झाला. जीवनात छोट्या छोट्या गोष्टीसाठी तणाव निर्माण होतो. माणूस अस्वस्थ होतो. यामुळे परस्पर विसंवाद वाढतो. धीराशिवाय साधना शक्य नाही. एखादी व्यक्ती आपले मन समजू शकते परंतु ध्यान महत्त्वपूर्ण होत नाही, ध्यानात सत्यता असणार नाही.

आपण बोलत आहोत श्रद्धा आणि सबुरीची. माणसाच्या मनात श्रद्धा असेल तर दगडातही देव दिसतो. आयुष्यातील निम्म्याहून अधिक समस्या टाळता येतात हे खरे आहे. घरे उद्‌ध्वस्त होण्यापासून वाचली आहेत. घाईघाईने घेतलेले निर्णय हानिकारक आहेत. पटकन चालणे, खाणे, बोलणे ही असभ्यतेची चिन्हे आहेत. जितके मोठे असेल तितकेच तो उच्च स्थानावर असेल. म्हणतात ना, शबरीने पण सबुरी व श्रद्धा ठेवली म्हणून राम भेटले, म्हणून श्रद्धा व सबुरी फार महत्त्वाची आहे.

– सौ. सविता चोरडिया





नगर शहरातील रामवाडी, कराचीवालानगर, कोठला ते मंगळवार बाजार, जेजे गल्ली, राज चेंबर या भागात अभिषेक कळमकर यांची प्रचारफेरी नुकतीच पार पडली. याप्रसंगी उपस्थित नागरिक.

# दहा वर्षांचा अन्याय शेवटी संपणारच, अभिषेक कळमकर आमदार होणारच

**रामवाडी परिसरातील नागरिकांचा निर्धार**

नगर – नगर शहरातील रामवाडी, कराचीवालानगर, कोठला ते मंगळवार बाजार, जेजे गल्ली, रजचेंबर या भागांमध्ये अभिषेक कळमकर यांची प्रचारफेरी नुकतीच पार पडली. या फेरीला नागरिकांचा प्रतिसाद मिळाला, तसेच कळमकर यांना मोठ्या प्रमाणात पाठिंबा दर्शवला गेला. गेल्या दहा वर्षांपासून विकासकामांपासून वंचित असलेल्या या भागातील नागरिकांनी यावेळी बदलाची मागणी केली आणि या वेळेस बदल घडणारच, असा निर्धार व्यक्त केला असल्याची माहिती त्यांनी पत्रकाद्वारे दिली.

प्रचारफेरी दरम्यान नागरिकांनी आपल्या परिसरातील अनेक समस्या उघडपणे मांडल्या. रस्त्यांची दुरवस्था, पाण्याची अस्थिरता, कचरा व्यवस्थापनाचा अभाव, सार्वजनिक सुविधांचा तोटा, तसेच सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून या भागाकडे पूर्णपणे दुर्लक्ष झाल्याची तक्रार नागरिकांनी मांडली. आम्हाला नेहमीच आश्वासने दिली जातात, परंतु प्रत्यक्षात कोणतीही ठोस कार्यवाही होत नाही. आमचे प्रश्न वर्षानुवर्षे तसेच राहिले आहेत, असे संतप्त नागरिकांनी सांगितले.

अभिषेक कळमकर यांनी या फेरीदरम्यान नागरिकांचे म्हणणे ऐकून घेतले आणि त्यांना आश्वासन दिले की, या भागात विकासकामांवर लक्ष देण्यासाठी मी संकल्पबद्ध आहे. येथील नागरिकांना गेल्या अनेक वर्षांपासून मिळालेल्या आश्वासनांचा फोलपणा आम्ही संपवणार आहोत. निवडून आल्यास, या भागावर झालेला अन्याय दूर करण्यासाठी आणि येथील लोकांचे जीवनमान उंचावण्यासाठी मी कटिबद्ध आहे.

कळमकर यांनी नागरिकांना विश्वास दिला की, मी केवळ आश्वासने देण्यासाठी नाही, तर त्यांची पूर्तता करण्यासाठी आलो आहे. या भागाच्या समस्यांवर ठोस उपाय योजना करण्यात येईल. त्यांनी विशेषतः रस्त्यांचे नूतनीकरण, नियमित पाणीपुरवठा, कचरा व्यवस्थापन आणि नागरिकांना मूलभूत सुविधा पुरविण्याच्या दिशेने प्रयत्न करण्याचे वचन दिले.

या फेरीत सहभागी नागरिकांनी सांगितले की, आता बदल हवा आहे. गेल्या काही निवडणुकीत फसवणूक झाली, पण यावेळी आम्ही कळमकरांना संधी देणार आहोत. त्यांनी दिलेले वचन आमच्यासाठी महत्त्वाचे आहे. अनेकांनी दहा वर्षांचा अन्याय संपवण्यासाठी आणि प्रगतीची नवीन दिशा मिळवण्यासाठी आम्ही अभिषेक कळमकर यांना पाठिंबा देणारच, असा निर्धार व्यक्त केला.

यंदाच्या निवडणुकीत या भागात मोठ्या प्रमाणात बदलाची मागणी होत असून, नागरिकांचा असा विश्वास आहे की, अभिषेक कळमकर यांच्या नेतृत्वाखाली त्यांच्या समस्या सुटतील आणि हा भाग पुन्हा एकदा विकासाच्या मार्गावर येईल.

# शहर मतदारसंघातील वंचित बहुजन आघाडीचे उमेदवाराच्या प्रचाराचा शुभारंभ

**शहरातील महापुरुषांच्या पुतळ्यांना अभिवादन करुन काढली प्रचार रॅली**

नगर – अहमदनगर शहर विधानसभा मतदार संघातील वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार हनीफ जैनुद्दीन शेख यांच्या प्रचाराचा शुभारंभ शुक्रवारी (दि.८ नोव्हेंबर) झाला. शहरातील महापुरुषांच्या पुतळ्यांना अभिवादन करुन प्रचार फेरी काढण्यात आली. यामध्ये वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते व महिला सहभागी झाल्या होत्या.

प्रारंभी मार्केटयार्ड चौकातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, माळीवाडा येथील महात्मा फुले व जुने बस स्थानक येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास अभिवादन करुन प्रचाराचा नारळ फोडण्यात आला. याप्रसंगी उमेदवार हनीफ जैनुद्दीन शेख, जिल्हाध्यक्ष योगेश साठे, दिपक पाटोळे, नगर तालुकाध्यक्ष मारुती पाटोळे, लक्ष्मण माघाडे, गणेश राऊत, सुरेश पानपाटील, संजय शिंदे, दिनू भोसले, बबलू भिंगारदिवे, आबिद शेख, आरिफ रजवी, जैद सय्यद आदी उपस्थित होते.

हनीफ जैनुद्दीन शेख यांनी सेवा, संरक्षण व विश्वासाची हमी देणारा वंचित घटकातील उमेदवार सर्वसामान्यांना पर्याय देण्यासाठी निवडणुकीच्या मैदानात उतरला आहे. राजकीय घराणेशाहीचा वारसा थांबवून सर्वसामान्यांचे हातात सत्ता येण्यासाठी ही उमेदवारी असल्याचे त्यांनी सांगितले.

योगेश साठे म्हणाले की, घराण्यांचा विकास नव्हे, तर सर्वसामान्यांचा विकास झाला पाहिजे. यासाठी वंचितने विधानसभा निवडणुकीत उमेदवार दिले आहेत. ओबीसी आरक्षण वाचण्याचे काम वंचित बहुजन आघाडीच्या माध्यमातून प्रकाश आंबेडकर करत असून, राजकारणात बहुजन समाजाला बरोबर घेऊन जाण्याचे कार्य ते करत असल्याचे त्यांनी सांगितले. दिपक पाटोळे यांनी दलित, मुस्लिम, आदिवासी या वंचित घटकातील समुदायाला नेतृत्व देण्याचे काम वंचित बहुजन आघाडीने केले. महायुती व महाआघाडीने या समाजाचा फक्त व्होट बँक म्हणून वापर केला. या समाजाला नेतृत्व व न्याय देण्याचे काम प्रकाश आंबेडकर करत असल्याचे त्यांनी सांगितले.



शहर विधानसभा मतदार संघातील वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार हनीफ जैनुद्दीन शेख यांच्या प्रचाराचा शुभारंभ प्रसंगी पदाधिकारी, कार्यकर्ते व उपस्थित महिला.

# विकासकामांमुळे विश्वास निर्माण झाल्याने नागरिकांनीच ही निवडणूक हातात घेतली

**आ. संग्राम जगताप यांचे प्रतिपादन; शहरात शक्तिप्रदर्शन करुन महायुतीच्या प्रचाराचा शुभारंभ**

नगर – विधानसभा निवडणुकीसाठी शहरात प्रचार करताना सर्वच भागांमध्ये मला नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. ठिकठिकाणी होणाऱ्या उत्स्फूर्त स्वागताने मी भारावून जात आहे. या विकास कामांमुळे नागरिकांमध्ये नवा विश्वास निर्माण झाला असून त्यांनीच निवडणूक हातात घेतली आहे. ही निवडणूक विकासाच्या मुद्यांवर लढवत असून गेल्या १० वर्षात केलेले विकासकामे नागरिकांपर्यंत घेऊन जात आहे. नागरिकांना अपेक्षित असलेले विकास कामे होत असल्याने नागरिकांमधून मोठे समाधान व्यक्त केले जात आहे. शहाराच्या सर्वांगीण विकासासाठी राज्य सरकार कडून कोट्यवधी रुपयांचा निधी मिळाला असल्याने शहरात मोठ्या प्रमाणात विकासकामे सुरु आहेत. भविष्यात या विकासकामांमुळे शहराची वेगळी ओळख निर्माण होणार आहे. हा शहर विकासाचा वेग अजून वाढवण्यासाठी नगरकरांनी मला पुन्हा मतांचा आशीर्वाद द्यावा. मतांचे हे ऋण शहराच्या सर्वांगीण विकासाने मी फेडणार आहे, असे प्रतिपादन महायुतीचे उमेदवार आ.संग्राम जगताप यांनी केले.





महायुतीचे उमेदवार आमदार संग्राम जगताप यांच्या प्रचाराचा शुभारंभ ग्रामदैवत श्री विशाल गणेश मंदिरात विधिवत पूजा करून करण्यात आला. यावेळी उपस्थित जनसमुदाय

महायुतीचे उमेदवार आमदार संग्राम जगताप यांच्या प्रचाराचा शुभारंभ शनिवारी सकाळी ग्रामदैवत श्री विशाल गणेश मंदिरात विधिवत पूजा करून करण्यात आला. माजी आमदार अरुण जगताप, भाजपाचे शहर जिल्हाध्यक्ष अभय आगरकर, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अनिल शिंदे, राष्ट्रवादीचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, आरपीआयचे शहराध्यक्ष किरण दाभाडे, भाजपाचे शहर विधानसभा प्रमुख महेंद्र गंधे आदींसह प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या हस्ते नारळ फोडून प्रचाराचा शुभारंभ करण्यात आला. तत्पूर्वी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळा, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले आदी महापुरुषांच्या पुतळ्यास आमदार संग्राम जगताप यांनी अभिवादन केले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यापासून शक्ती प्रदर्शन करत प्रचारफेरी काढण्यात आली. यावेळी ठिकठिकाणी पुष्पहार व जेसीबीतून पुष्पृष्टी करून व फटाक्यांची आतषबाजी करून प्रचारफेरीचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. नागरिकांना अभिवादन करत संग्राम जगताप प्रचारफेरीत चालत होते.

अभय आगरकर म्हणाले, या विधानसभा निडणुकीत राज्यातील तीन प्रमुख राजकीय पक्ष एकत्र येत महायुती झाली आहे. राज्याचा विकास केवळ महायुतीचे सरकारच करू शकत असल्याने राज्यात पुन्हा महायुतीचीच सत्ता येणार आहे. नगरमध्येही संग्राम जगताप यांचा विजय निश्चित आहे.

अनिल शिंदे म्हणाले, संग्राम जगताप यांनी शहराच्या विकासात मोलाची भर घातली आहे. त्यामुळे रस्ते, पाणी, आरोग्य, लाईट आदी मूलभूत समस्या सुटल्या आहेत. या विकासकामांमुळे शहरातील जनता आ.जगतापांच्या पाठीशी ठामपणे उभी आहे.

संपत बारस्कर म्हणाले, संग्राम जगताप यांच्या प्रचाराचा शुभारंभ शक्तीप्रदर्शनाने झाला आहे. संग्राम जगताप यांच्या झंजावातामुळे त्यांनी प्रचारात मोठी आघाडी घेतली आहे. महायुतीच्या सर्व घटक पक्षांच्या पदाधिकाऱ्यांचे मोठे सहकार्य निवडणुकीत होत आहे.

यावेळी शिवसेनेचे शहर प्रमुख सचिन जाधव, किशोर डागवले, अविनाश घुले, गणेश भोसले, अशा निंबाळकर, संजय सपकाळ, पोपट पाथरे, काका शेळके, माणिक विधाते, प्रशांत मुथा, सचिन पारखे, प्रकाश भागानगरे, संजय चोपडा, मनोज कोतकर, बाबासाहेब वाकळे ,गीता गिल्डा, मालन ढोणे, रेश्मा आठरे, अंजली आढाव, लतिका पवार, दत्ता मुदगल, दीपक सूळ, सुनील काळे आदींसह महायुतीतील घटक पक्षांचे पदाधिकारी उपस्थित होते




# निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नगर तालुक्यात पोलिसांचा रूट मार्च

नगर –आगामी विधानसभा निवडणूकांच्या अनुषंगाने नगर तालुका पोलीस ठाणे हद्दीतील रुई छत्तीसी, साकतखुर्द, अरणगाव, कौडगाव, भातोडी आदी गावांमध्ये शुक्रवारी (दि. ८) नगर तालुका पोलिसांनी रूट मार्च घेतला.

रूट मार्च दरम्यान नगर तालुका पोलीस ठाणे अंतर्गत विधानसभा निवडणूकचे अनुषंगाने नागरिकांना कोणी आपल्यावर मतदानाकरिता दबाव टाकणे, पैशाचे अमिष दाखविणे, तसेच मतदानापासून वंचित राहावे याकरिता धाक-दडपशाही करत असले बाबत चौकशी केली असता तसा कोणता अगर कसलाही प्रकार येथे होत नसलेबाबत नागरिकांनी रूटमार्च दरम्यान सांगितले.



विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नगर तालुक्यातील साकतखुर्द येथे रूटमार्च करताना नगर तालुका पोलिसांचे व सीआरपीएफचे जवान.

निवडनुक प्रक्रिये दरम्यान कुठलाही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी ड्रोन कॅमेऱ्याची करडी नजर रहाणार असून मतदारांनी भयमुक्त वातावरणात मतदान करण्याचे अवाहन यावेळी सहा.पोलीस निरीक्षक प्रल्हाद गीते यांनी केले यांनी केले आहे. रुट मार्च दरम्यान ड्रोन कॅमेऱ्यांचा वापर करण्यात आला. यावेळी तालुका पोलीस ठाण्याचे स.पो.नि. प्रल्हाद गीते, पोलीस उपनिरीक्षक सातभाई, पो.हे.कॉ. सोनटक्के, सचिन वनवे, पो.हे.कॉ. शिंदे, पो.कॉ. सोमनाथ वढणे, गोरे, यांच्यासह सीआरपीएफ अधिकारी आझाद खान व जवानांचा फौज फाटा मोठ्या संख्येने उपस्थित होता.

### ड्रोन कॅमेऱ्याने घेतला गावठी हातभट्टीचा अचूक वेध

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नगर तालुक्यातील साकतखुर्द येथे रूटमार्च साठी नगर तालुका पोलिसांचा फौंजफाटा दाखल झाला असता ताफ्यात समाविष्ट ड्रोन कॅमेऱ्याने गावठी दारूची हातभट्टी अचूक टिपली. पोलिसांच्या ताफ्यापासून काही अंतरावर असलेल्या सीनानदी काठी झाडाझुडपात असलेली हातभट्टी कॅमेऱ्यात कैद झाल्यानंतर नगर तालुका पोलीस ठाण्याचे सपोनि प्रल्हाद गीते यांच्या सूचना व मार्गदर्शनाखाली त्याठिकाणी जाऊन तेथील हात भट्टीसाठी लागणारे सर्व साहित्य व रसायन नष्ट करण्यात आले.

